cmyk

## संपादकीय

### छोटे पक्ष विजयाची गणिते बिघडविणार

महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेले राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट, काँग्रेस आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षांनी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जुळवाजुळव सुरू केली आहे. महाराष्ट्रात सध्या सत्तेवर असलेल्या महायुतीच्या घटक पक्षांनी सुद्धा आपापल्या पातळीवर विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू केली आहे.


दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### राज्यातील काही भागाता आज पावसाचा यलो अलर्ट

पुणेः कोकण, गोवा आणि मध्य महाराष्ट्राच्या घाट भागातील जिल्ह्यांच्या काही भागात शनिवारी (दि.१०) मुसळधार पावसाची शक्यता आहे. उत्तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्येही तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ, सोसाट्याच्या वाऱ्यासह मध्यम पाऊस पडण्याची शक्यता असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे. विदर्भातील काही भागातही मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.


बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–११० शनिवार दि.१० ऑगस्ट २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने– ६ किंमत ३ रूपये


# नुकसान लाखात; मदत हजारात!

## पूरबाधित शेतकरी हतबल तर सरकार गपगार, भरपाईची रक्कम वाढविण्याची शेतकऱ्यांची मागणी

**कोल्हापूर । प्रतिनिधी**

**कोल्हापूर जिल्ह्यात मागच्या काही दिवसात झालेल्या पावसाने महापूर परिस्थिती निर्माण झाली होती. या महापुरात २०१९, २०२१ नंतर आता २०२४ साली शेती पिकाचे प्रचंड नुकसान झाले आहे. हजारो हेक्टर शेती पाण्याखाली कुजल्याने भरीव मदतीची मागणी होत आहे. प्रशासनाच्या वतीने नुकसानीचे पंचनामे करण्यास सुरूवात झाली आहे. मात्र नुकसान लाखात अन् मदत हजारांत अशी अवस्था दिसून येत आहे. यामुळे शेतकरी हतबल झाल्याचे दिसून येत असून, सरकार मात्र याबाबतीत गपगार असल्याचे जाणवत आहे.**



कृष्णा, पंचगंगा, वारणा, दूधगंगा नद्यांचा महापूर ओसरला तसे नुकसानीची दाहकता समोर येत आहे. शेतामध्ये अद्याप गुडघाभर चिखल असल्याने पंचनाम्याचे काम धीम्या गतीने सुरू आहे. बागायती शेतीला हेक्टरी २७ हजार, तर जिरायत शेतीला १३ हजार ६०० रुपयांची भरपाई शासनाने निश्चित केली आहे. नुकसानीच्या तुलनेत ही भरपाई अत्यंत कमी असल्याने भरपाईची रक्कम वाढवण्याची मागणी पूरबाधित शेतकऱ्यांमधून होत आहे. सुमारे सतरा दिवसांपासून पूरग्रस्त गावांमध्ये शेती पाण्याखाली गेल्याने मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. सतरा दिवस तुंबून राहिलेल्या पाण्यामुळे घरांबरोबर परिसरात मोठ्या प्रमाणावर दुर्गंधीही पसरली आहे. पूरबाधित शेतातील पिकांचे केवळ अस्तित्व शिल्लक राहिले आहे. ऊस, भुईमूग, सोयाबीन, मूग, भाजीपाला पिकांचे कोट्यवधींचे नुकसान झाले आहे. पाण्यात राहिलेली कच्ची घरेही कोसळण्याच्या मार्गावर आहेत. पंचनामे पूर्ण झाल्यानंतर एकूण पिकांच्या नुकसानीचा आकडा समोर येणार आहे. पान २ वर

### भरपाईची रक्कम तोकडी...

**शासनाने निश्चित केलेली पिकांची भरपाई तोकडी आहे. कुजलेले पिके शेतातून काढून टाकण्याइतका खर्च भरपाईतून निघत नाही. त्यामुळे शासनाने झालेल्या खर्चाच्या आधारावर नुकसानीची भरपाई निश्चित करण्याची मागणी पूरग्रस्त शेतकऱ्यांमधून होत आहे.**



### मनीष सिसोदिया यांना जामीन मंजूर

नवी दिल्लीः दिल्लीतील कथित मद्य धोरण घोटाळा प्रकरणी दिल्लीचे माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांना शुक्रवारी (दि.९) सर्वोच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला. उच्च न्यायालयाने सिसोदिया यांचा जामीन अर्ज फेटाळला होता. या निर्णयाविरोधात त्यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. दिल्लीचे माजी उपमुख्यमंत्री सिसोदिया यांना दिल्ली मद्य धोरण प्रकरणी १७ महिने तुरुंगवासानंतर जामीन मिळाला आहे.

### गोविंदांना १० लाखांचे विमा संरक्षण मिळणार

ठाणेः परंपरागत दहिहंडी उत्सवामध्ये मानवी मनोरे रचणाऱ्या गोविंदांचे अपघात होतात. त्यामुळे मानवी मनोरे रचताना दुर्घटनाग्रस्त झालेल्या गोविंदाना सरकारतर्फे विमा संरक्षण देण्यात येणार आहे. त्या अंतर्गत ७५ हजार गोविंदाना प्रत्येकी दहा लाखाचा विमा संरक्षण देण्यात येणार आहे. दहिकाला उत्सव मोठ्या प्रमाणात लोकप्रिय असून मुंबई–ठाणे शहरांबरोबरच महाराष्ट्रातील अन्य शहरांमध्येही हा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा होतो. या उत्सवात १५ ते ४० वयोगटातील तरूण–तरूणींचा मोठ्या प्रमाणात सहभाग असतो.

# मनसैनिकांनी शिवसैनिकांना पळवून लावले

## राज ठाकरेंसमोरच राडा; झटापटीत शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गणेश वरेकरांचा शर्ट फाटला





**बीड । प्रतिनिधी**

**मनसे प्रमुख राज ठाकरे हे बीड जिल्हा दौऱ्यावर आले असता त्यांच्यासमोरच मोठा राडा झाला आहे. उबाठा शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांच्यासह ८ ते १० जणांनी राज ठाकरे यांच्या गाडीसमोर सुपाऱ्या फेकल्या. त्यानंतर मनसैनिक आक्रमक झाल्यानंतर शिवसैनिकांना त्यांनी तेथून अक्षरक्षः पळवून लावले. यावेळी मोठ्या प्रमाणात झटापट झाल्याने गणेश वरेकर यांचा शर्ट फाटला असल्याचे दिसून आले. हा सर्व प्रकार बीडमधील जालना रोडवर हॉटेल अन्विता येथे शुक्रवारी दुपारनंतर घडला.**

राज्यात आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अनेक नेत्यांचे दौरे सुरू असून मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचाही मराठवाडा दौरा सुरू झाला आहे. सोलापूर जिल्ह्यातून राज ठाकरेंच्या दौऱ्याला सुरुवात झाली होती. मात्र, या दौऱ्यादरम्यान महाराष्ट्राला आरक्षणाची गरज नाही, असे विधान राज ठाकरेंनी केल्यानंतर मराठा समाज आक्रमक झाल्याचं पाहायला मिळाले. धाराशिव जिल्ह्यात मराठा आंदोलकांनी राज ठाकरे ज्या हॉटेलमध्ये थांबले तेथे जावून राडा केला होता. तसेच प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन केले होते. राज ठाकरेंविरुद्ध घोषणाबाजीही केली होती. हिंगोलीतून शुक्रवारी राज ठाकरेंचा पान २ वर

### शिवसेनेपेक्षा मनसेचीच ताकद दिसली

उबाठा शिवसेनेने राज ठाकरे यांच्यासमोर राडा घातला. मात्र हा राडा घालण्यासाठी मोजकेच (८–१०?) शिवसैनिक त्या ठिकाणी होते. त्यामुळे त्यांच्यापेक्षा मनसैनिकांचीच ताकद दिसून आली. शिवसैनिकांना समोरुन रेटा वाढत चालल्याचे दिसत असल्याने शेवटी काढता पाय घ्यावा लागला, असे म्हटले जात आहे.

### सहा मतदार संघाचा आढावा

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे बीडमध्ये मोठ्या जल्लोषात कार्यकर्त्यांकडून स्वागत करण्यात आले. जालना रोड परिसरात अडीच क्विंटल फुलाच्या हाराने जेसीबीच्या माध्यमातून स्वागत झाले. राज ठाकरे शुक्रवार आणि शनिवारी बीडमध्ये आहेत. या दोन दिवसाच्या दौऱ्यात ते ६ विधानसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहेत.

### सुपारी बहाद्दर चलो जावं, शिवसैनिकांकडून घोषणाबाजी

लोकसभेला सुपारी घेतली होती, आता विधानसभेला कोणाची सुपारी घेऊन तुम्ही आला आहात. मनोज जरांगे पाटलांचा सुंदर आंदोलन सुरू आहे, त्यास तुम्ही विरोध करता. त्यामुळे, तुम्ही कुणाची सुपारी घेऊन आलात हे विचारण्यासाठी आम्ही इथं आलो आहोत, अशा शब्दात बीड जिल्हा शिवसेना अध्यक्ष गणेश वरेकर यांनी मनसे प्रमुखांचा ताफा अडवल्याचा कारण सांगितले. तसेच, चले जाव, सुपारी बहाद्दर चले जाव, अशी घोषणाबाजी यावेळी करण्यात आली.

### राजेंद्र मोटे, सुमंत धस, शैलेश जाधव, कल्याण केदार, करण लोंढे चमकले

गणेश वरेकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी राज ठाकरे यांच्या गाडीसमोर सुपाऱ्या फेकून घोषणाबाजी केली. यावेळी आक्रमक भूमिका घेत जिल्हाप्रमुख राजेंद्र मोटे, सुमंत धस, शैलेश जाधव आणि केज तालुकाप्रमुख कल्याण केदार, बीड शहराध्यक्ष करण लोंढे यांनी शिवसैनिकांना धक्काबुक्की करीत मागे ढकलले. गोंधळ घालणाऱ्यांना यावेळी चांगलाच चोप दिला असल्याचेही मनसैनिकांनी म्हटले आहे.

## » घटना घडण्यापूर्वी इंटेलिजन्स नव्हते का?

### पोलीस अधीक्षकांना राज ठाकरेंचा सवाल

शिवसेना पदाधिकाऱ्यांनी केलेल्या आंदोलनानंतर मनसेने आक्रमक पवित्रा घेतला असून राज ठाकरे यांनी पोलीस अधिकाऱ्यांशी संवाद साधत याबाबत विचारणा केली आहे. अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर आणि पोलीस उपाधीक्षक विश्वंभर गोरडे यांना हॉटेलमध्ये बोलावून घटना घडण्यापूर्वी आपले इंटेलिजन्स नव्हते का? असा सवाल यावेळी राज ठाकरे यांनी उपस्थित केला. अशी परिस्थिती निर्माण व्हायला नको होती, अशी खंत त्यांनी यावेळी व्यक्त केली. त्याबरोबरच भविष्यात असे प्रकार व्हायला नकोत त्यासाठी खबरदारी घ्या अशा सूचना राज ठाकरे यांनी दोन्ही पोलीस अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच मनसे नेते संदीप देशपांडे यांनी सुद्धा बीड मधील राड्यावरून आक्रमक भूमिका घेत सुरुवात तुम्ही केली शेवट आम्ही करू असा इशारा दिला आहे.

### मुंबईतील महाविद्यालयाच्या हिजाब बंदीला सर्वोच्च न्यायालयाची स्थगिती

**नवी दिल्ली । वृतसंस्था**



**मुंबईतील एन. जी. आचार्य डी. के. मराठे महाविद्यालयाने जारी केलेल्या हिजाब बंदीला सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी (दि.९) स्थगिती दिली. महाविद्यालयाने परिपत्रक जारी करुन हिजाब, निकाब, बुरखा, टोपी आणि तत्सम पोशाख परिधान करण्यावर बंदी घातली होती. या परिपत्रकाला स्थगिती देण्याचा न्यायालयाने निर्णय घेतला. महाविद्यालयाची सूचना कायम ठेवणाऱ्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाला याचिकाकर्त्यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते.** पान २ वर

### आमच्या यात्रेला कोणताच रंग नाही–जयंत पाटील

#### राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या शिवस्वराज्य यात्रेला सुरुवात

**रायगड । प्रतिनिधी**



**महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचे जन्मस्थान शिवनेरी किल्ल्याच्या पहिल्या पायरीचे दर्शन घेऊन महाराष्ट्रात रयतेचे राज्य आणण्याचा निर्धार करत शुक्रवारी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाची शिवस्वराज्य यात्रा सुरू झाली.**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, अनिल देशमुख, खा. अमोल कोल्हे, आ. अशोक पवार, युवक प्रदेशाध्यक्ष महेबूब शेख, महिला अध्यक्षा रोहिणीताई खडसे आणि स्थानिक प्रमुख पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. यावेळी बोलताना जयंत पाटील म्हणाले की, आज महायुती सरकारच्या काळात राज्यातील शेतकरी, शेतमजूर, महिला, तरुण, विद्यार्थी कोणताच घटक समाधानी नाही. सरकारने सर्वत्र भ्रष्टाचार माजवला आहे. राज्याची परिस्थिती दयणीय असताना राज्यात रयतेचे राज्य आणण्यासाठी शिवस्वराज्य यात्रा जनतेमध्ये जनजागृती करणार आहे. पान २ वर

### नीट पीजी परीक्षा ११ ऑगस्ट रोजीच होणार, स्थगिती देण्यास सर्वोच्च न्यायालयाचा नकार

**नवी दिल्ली। वृतसंस्था**

**परीक्षा केंद्रांच्या वाटपातील समस्यांमुळे नीटपीजी २०२४ च्या फेर वेळापत्रकाची मागणी करणारी विनंती याचिका स्वीकारण्यास शुक्रवारी (दि.९ ऑगस्ट) सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला. यामुळे सदरील परीक्षा ही ११ ऑगस्ट रोजीच होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.**




सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड म्हणाले की, आम्ही नवीन शैक्षणिक धोरण तयार करू शकत नाही आणि हे एक परिपूर्ण जग नाही. सर्वोच्च न्यायालयाने याचिकेला परवानगी दिल्यास ‘‘दोन लाख विद्यार्थी आणि चार लाख पालकांना त्रास होईल, असे निरीक्षणही त्यांनी नोंदवले. पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.०८ ऑगस्ट २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू :२.०० क्विंटल | २,६२० | २,६२० | २,६२० |
| ज्वारी/हायब्रिड :३९.५० क्विंटल | २,२०० | २,८०० | २,३३४ |
| मूग :१४.५० क्विंटल | १,९५० | ३,०४१ | २,४५५ |
| तूर : ६९.५० क्विंटल | ५,७०१ | १०,६५० | ८,९३८ |
| उडीद : २.५० क्विंटल | ४,९०१ | ७,४०० | ६,१५० |
| बाजरी: ३०.०० क्विंटल | २,६०० | २,८२० | २,६५५ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: १२७.५० क्विंटल | ३,८०० | ४,३०० | ४,१५० |
| हरभरा: २.५० क्विंटल | ५,४०० | ५,५०० | ५,४५० |

# नगर–बीड–परळी मार्गावरील सर्वात लांब पुलावर धावली रेल्वे

## अंमळनेर ते विघनवाडी मार्गावरील चाचणी यशस्वी; बीडपासून ४३ किमीपर्यंत आली आगीनगाडी




**बीड । प्रतिनिधी**

गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या बीडकरांच्या जिव्हाळ्याच्या रेल्वेच्या प्रश्नवर शुक्रवारी पुन्हा एक पाऊल पुढे पडले आहे. अंमळनेर ते विघनवाडी या मार्गावर जलदगती रेल्वेची चाचणी यशस्वी झाली आहे. यावेळी नगर–बीड–परळी या लोहमार्गावरील सर्वात लांब आणि उंच असलेल्या पुलावरुन शुक्रवारी रेल्वे सुसाट वेगाने धावली आहे. विघनवाडी स्थानक हे बीडपासून ४३ किमीवर असल्याने रेल्वे आता बीडच्या जवळ आली आहे.

गेल्या अनेक वर्षापासून बीडकरांचा रेल्वेचा प्रश्न कायम आहे. स्व. गोपीनाथ मुंडे यांनी २००९ पासून रेल्वे कामाला गती देण्याचा प्रयत्न केला. बीडला रेल्वे आणण्याचे त्यांचे स्वप्न होते. त्यादृष्टीने त्यांनी कामही केले. मात्र त्यांच्या निधनानंतर गेल्या १० वर्षात माजी खा. प्रितमताई पान २ वर

### खा.बजरंग सोनवणे यांच्याकडून पोस्ट

खा. बजरंग सोनवणे हे अधिवेशनामुळे दिल्लीत असून शुक्रवारी झालेल्या अंमळनेर ते विघनवाडी या मार्गावरील चाचणीबद्दल सोशल मिडीयावर पोस्ट टाकून समाधान व्यक्त केले आहे. तसेच आपण खासदार झाल्यावर रेल्वे अधिकाऱ्यांबरोबर घेतलेल्या बैठकीत दिलेला शब्द अधिकाऱ्यांनी पाळला असल्याचे त्यात म्हटले आहे.

### विघनवाडी स्थानकावर सामाजिक कार्यकर्त्यांकडून स्वागत

बीडच्या रेल्वे मार्गावरील चाचणीला सहसा नेतेमंडळी यापुर्वी गेलेले आहेत. यावेळी खा. बजरंग सोनवणे हे दिल्लीत आहेत, प्रितमताई मुंडे या माजी खासदार झाल्याने त्या आल्या नाहीत. तर पंकजाताई मुंडे यांचा लोकसभेला पराभव झाला. त्यामुळे त्या आल्या नाही. शेवटी सामाजिक कार्यकर्ते अजिनाथ गवळी यांनी विघनवाडी स्थानकावर रेल्वे पोहचल्यावर रेल्वे अधिकारी व कर्मचाऱ्यांचे स्वागत केले.

cmyk

## अग्रलेख

# छोटे पक्ष विजयाची गणिते बिघडविणार

महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेले राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट, काँग्रेस आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षांनी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जुळवाजुळव सुरू केली आहे. महाराष्ट्रात सध्या सत्तेवर असलेल्या महायुतीच्या घटक पक्षांनी सुद्धा आपापल्या पातळीवर विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. या सर्व घडामोडी घडत असतानाच राज्यातील काही महत्त्वाच्या पण छोट्या पक्षांनी ज्या प्रकारे आपली वेगळी समीकरणे बनवण्यास प्रारंभ केला आहे त्याकडे सुद्धा या प्रमुख राजकीय पक्षांना लक्ष द्यावे लागणार आहे. महाराष्ट्रातील आगामी विधानसभा निवडणूक प्रामुख्याने सत्ताधारी महायुती आणि विरोधी बाकावर बसलेली महाविकास आघाडी यांच्यातील असली तरी काही प्रभावी छोट्या पक्षांची स्पर्धा या दोन्ही आघाड्यांना जाणवणार आहे असे संकेत आतापासूनच मिळू लागले आहेत.

लोकसभा निवडणुकीमध्ये सत्ताधारी भारतीय जनता पक्षाला पाठिंबा जाहीर केलेले महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे राज ठाकरे यांनी गेल्याच आठवड्यात अत्यंत स्पष्ट शब्दांमध्ये आम्ही विधानसभा निवडणूक स्वबळावर लढवणार असल्याचे घोषित केले आहे. आमचा पाठिंबा फक्त लोकसभा निवडणुकीपुरता होता पण; विधानसभेमध्ये मात्र आम्ही २२५ पेक्षा जास्त उमेदवार उभे करणार आहोत असे त्यांनी स्पष्ट केले आहे. महायुतीला ज्यांच्या मैत्रीची अपेक्षा होती, त्या राज ठाकरे यांनी अशी भूमिका घेतली असतानाच महाविकास आघाडी किंवा इंडिया आघाडीचा एक घटक पक्ष असलेल्या आम आदमी पक्षाने सुद्धा महाराष्ट्रात स्वबळावरच निवडणूक लढवण्याची घोषणा केली आहे. मुंबईतील सर्व ३६ जागा आम आदमी पक्ष स्वबळावर लढवणार आहे आणि महाराष्ट्रातील इतर जागांची सुद्धा चाचपणी त्यांनी सुरू केली आहे. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे महायुतीतील घटक पक्ष असलेल्या प्रहार संघटनेचे बच्चू कडू यांनी सुद्धा तिसऱ्या आघाडीचे सुतोवाच केले असून त्या पार्श्वभूमीवर त्यांनी एमआयएमचे नेते इम्तियाज जलील आणि शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांच्या बरोबर बैठक घेतली आहे. राज्यात तिसऱ्या आघाडीचा प्रयोग करण्यासाठी हे पक्ष उत्सुक आहेत महाराष्ट्रातील आणखी एक चर्चेत असलेला पक्ष म्हणजे प्रकाश आंबेडकर यांचा वंचित बहुजन आघाडीने सुद्धा विधानसभेमध्ये स्वबळ आजमावण्याचा निर्णय घेतला आहे. अर्थात बच्चू कडू, राजू शेट्टी किंवा इम्तियाज जलील यांनी प्रकाश आंबेडकरांनी आपल्या आघाडीत सामील व्हावे अशा दृष्टीने प्रयत्नही सुरू केले आहेत. या सर्व छोट्या पण महत्त्वाच्या पक्षांची अशा प्रकारे स्पर्धा निर्माण झाली असतानाच मराठा आरक्षणासाठी मैदानात उतरलेले मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी सुद्धा विधानसभा निवडणुकीच्या मैदानात उडी घेण्याची घोषणा केली आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळवायचे असेल तर सत्तेवर येण्याचाच पर्याय आहे या भूमिकेतून मनोज जरांगे यांनी सुद्धा निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. मराठा आरक्षणाला विरोध करणाऱ्या सर्वपक्षीय नेत्यांना विधानसभा निवडणुकीत पराभूत करण्याचा निर्धार मनोज जरांगे यांनी केला आहे. ही सर्व परिस्थिती पाहता राज्यातील जे प्रमुख सहा पक्ष दोन आघाड्यांमध्ये विभागले गेले आहेत, त्यांना या निवडणुकीमध्ये यश मिळवण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागणार आहेत.

सत्तेवर असलेले महायुतीचे घटक पक्ष विविध सरकारी निर्णयांच्या माध्यमातून मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत असतानाच विरोधी पक्षांनी सरकारवर टीका करून मतदारांना आपलेसे करण्याचे धोरण स्वीकारलेले दिसते पण; या सर्व घडामोडींमध्ये या छोट्या पक्षांमुळे आपले गणित कसे बिघडू शकते याचा विचार सर्वांनाच करावा लागणार आहे. शिवसेनेच्या मतदारांवर अवलंबून असलेला राज ठाकरे यांचा महाराष्ट्र नवनिर्माण सेना असो किंवा शहरी भागामध्ये काही प्रमाणात लोकप्रिय असलेला आम आदमी पक्ष असो किंवा ग्रामीण भागांमध्ये बऱ्यापैकी मतदारांचा पाया असलेली राजू शेट्टी यांची शेतकरी संघटना असो किंवा मुस्लिम मतदारांमध्ये प्रभाव असलेला एमआयएम असो किंवा प्रकाश आंबेडकर यांचा पक्ष असो हे सर्व छोटे पक्ष मतदानाची विभागणी कशाप्रकारे करतात यावरच विधानसभा निवडणुकीच्या निकालाचे भवितव्य अवलंबून राहणार आहे. स्वबळ आजमावण्याचा निर्णय घेतलेल्या या छोट्या पण प्रभावशाली पक्षांना विधानसभा निवडणुकीमध्ये किती यश मिळेल याबाबत जरी शंका असली तरी काही महत्त्वाच्या राजकीय पक्षांची विजयाची गणिते बिघडण्याचे काम मात्र हे पक्ष निश्चितपणे करू शकतात. साहजिकच महायुती आणि महाविकास आघाडी सध्या एकमेकांना जरी आपले विधानसभा निवडणुकीतील स्पर्धक मानत असले तरी या दोन्ही आघाड्यांना या छोट्या राजकीय पक्षांची स्पर्धा सुद्धा लक्षात घ्यावी लागणार आहे. एकतर या छोट्या राजकीय पक्षांनी स्वबळ न आजमावता आपल्या सोबत यावे म्हणून त्यांना प्रयत्न करावे लागणार आहेत किंवा निवडणुकीत या राजकीय पक्षांची स्पर्धा जाणवणार नाही आणि आपले गणित विस्कटणार नाही अशा प्रकारे वेगळी राजकीय रणनीती त्यांना आखावी लागणार आहे. एक मात्र निश्चित आहे की राज्याच्या राजकारणात महत्त्वाच्या असलेल्या या छोट्या पक्षांनी सुद्धा आता स्वबळावर विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याचा निर्णय घेतला असल्याने विधानसभेचे हे रणांगण जास्तच रंगतदार होणार आहे.

## दैनिक राज्य लोकतंत्रच्या बातमीचा परिणाम

# तहसीलदारांकडून वाळूचे ३ हायवा जप्त

**जालना । प्रतिनिधी**

**मंठा तालुक्यामध्ये वाळूमाफ्याचा धुमाकूळव हायवा मध्ये जास्त वाळू भरल्यामुळे रस्त्याला पडले खड्डे याला जबाबदार कोण असे सामान्य नागरिकाकडून बोलल्या जात होते याप्रकरणी जिल्हाधिकारी व अप्पर जिल्हाधिकारी यांनी तत्काळ लक्ष द्यावे अशी मागणी सर्वसामान्य नागरिकाकडून करण्यात येत होती . याप्रकरणी दै राज्य लोकतंत्र या वृत्तपत्रांमध्ये बातमी प्रसिद्ध करण्यात आली होती या बातमीची दखल घेऊन तहसीलदार मंठा यांनी दि९ ऑगस्ट रोजी धडाकेबाज कारवाई करून विदर्भामध्ये वाळू घेऊन जाणारे बिना नंबरचे वाळूचे तीन टिप्पर जप्त केले आहे. परंतु सदरील कारवाई कायमस्वरूपी होणे गरजेचे आहे. सदरील बातमी प्रसिद्ध झाल्यामुळे जिल्हाधिकारी व अप्पर जिल्हाधिकारी यांनी मंठा तहसीलदार यांना आदेश करून तात्काळ कारवाई करण्याचे आदेश केले होते म्हणून ही कारवाई झाल्याचे समजते. तालुक्यातील सासखेडा, टाकळखोपा, तळणी येथील वाळू साठ्यावरून जुन्या ऑनलाइन रॉयल्टीवर मोठ्या प्रमाणात टाकळखोपा, वाघाळा, कानडी, देवठाणा या ठिकाणाहून चोरटी वाहतूक सर्रास सुरू आहे.**




मंठा तालुक्यातील तळणी परिसरातील पुर्णापाटी ते वाघाळा या ६ कि.मी. रस्त्यांवर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहे. टाकळखोपा येथील रस्त्यांवरील खड्ड्यात शाळकरी विद्यार्थ्यांचे वाहन फसल्यामुळे संतप्त झालेल्या विद्यार्थ्यांनी ' त्या ' खड्ड्यांत चक्क तीन तास आंदोलन केले होते. या आंदोलनामुळे टाकळखोप्यातील वाळू चोरीचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे .टाकळखोपा येथे रात्रंदिवस अवैध वाळू उत्खनन करून चोरी सुरू असते. भर पावसाळ्यात नदीच्या पाण्यातुन किन्ही व्दारे वाळू उपसा सुरू आहे . अवैध वाळू वाहतूकीमूळे वाघाळा - टाकळखोपा - इंचा - पुर्णा पाटी या ६ कि. मी रस्त्यांची अत्यंत दुरावस्था झाली आहे . यातील वाघाळा - टाकळखोपा - इंचा या चार कि. मी रस्त्यांच्या डांबरीकरणासाठी तब्बल पाच कोटीचा निधीतून नवीन तयार झालेल्या रस्त्यांवर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे निर्माण झाले. 'त्या ' खड्ड्यात चिखल व पाणी साचुन छोटी वाहने फसत असल्याच्या घटना वाढल्या आहेत. या आंदोलनामुळे टाकळखोपा येथील वाळू साठ्यांवर वाळू भरण्यासाठी आलेली शेकडो वाळूची वाहने अडकून पडत आहेत. पुर्णापाटी ते वाघाळा दरम्यानच्या मोठमोठ्या खड्ड्यामुळे विद्यार्थ्यांसह ग्रामस्थांना अतोनात त्रास सहन करावा लागत आहे. वाळू माफियांनी महसूल विभागाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांसोबत आर्थिक हितसंबंध जोपासून बेकायदेशीर रित्या मुरूम चोरी करून नदीपात्रातून रस्ते तयार केल्यामुळे शेकडो हायवाद्वारे वाळू वाहतूक सुरू आहे.टाकळखोपा येथील वाळू साठ्यांवर महसूलचे कर्मचारी नसुन डेपोधारक नसतांना वाळू वाहनधारकांनी डेपो ताब्यात घेऊन जेसीबीच्या साह्याने वाळू वाहनात भरली जात असूनही तहसीलदार सोनाली जोंधळे, मंडळ अधिकारी गणेश कुलकर्णी व तलाठी महेंद्र साळवे यांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येते. रविवार ता.४ रोजी शासकीय सुट्टी असल्यामुळे सासखेडा येथील वाळू डेपो वरुन रॉयल्टीच्या नावाखाली टाकळखोपा , कानडी , देवठाणा येथुन अनेक वाहने अवैध वाळू भरून मंठाकडे व विदर्भातील लोणारकडे जात होती. यामुळे शासनाचा कोट्यावधी रुपयाचा महसूल बुडत आहे.

# संसदेचे कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**लोकसभा आणि राज्यसभेचे २६५ वे अधिवेशन शुक्रवारी अचानक तहकूब करण्यात आले, म्हणजे सभागृहाचे चालू अर्थसंकल्पीय अधिवेशन संपले आहे. गेल्या महिन्यात २२ जुलैपासून सुरू झालेल्या या अधिवेशनाचे कामकाज १२ ऑगस्टपर्यंत चालणार होते. पण, शुक्रवारीच त्याची सांगता झाली. जर आपण १८ व्या लोकसभेच्या या दुसऱ्या सत्रात झालेले कामकाज पाहिले तर, सभापती ओम बिर्ला यांच्या मते, या अधिवेशनाची कार्य उत्पादकता १३६ टक्के आहे.**

या अधिवेशनात झालेल्या कामकाजाचा तपशील सभागृहात मांडताना लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला म्हणाले की, या अधिवेशनात लोकसभेच्या १५ बैठका झाल्या, ज्या ११५ तास चालल्या. २३ जुलै रोजी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सभागृहात केंद्रीय अर्थसंकल्प (२०२४-२०२५) सादर केला. २७ तास १९ मिनिटे चाललेल्या सभागृहात केंद्रीय अर्थसंकल्पावरील चर्चेत १८१ खासदारांनी भाग घेतला. ज्याला अर्थमंत्र्यांनी ३० जुलै रोजी उत्तर दिले. ५ ऑगस्ट रोजी अर्थसंकल्पाशी संबंधित विनियोग विधेयक मंजूर करण्यात आले. अधिवेशनादरम्यान एकूण १,३४५ पेपर सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. या सत्रादरम्यान, २२ जुलै रोजी होणाऱ्या ऑलिम्पिक स्पर्धेसाठी भारताच्या तयारीबाबत नियम १९३ अंतर्गत अल्पकालीन चर्चा झाली. ३१ जुलै रोजी, देशाच्या विविध भागात भूस्खलन आणि पुरामुळे होणारी जीवित आणि मालमत्तेची हानी या विषयावर नियम १९७ अंतर्गत लक्षवेधी प्रस्ताव घेण्यात आला. अधिवेशनात ६५ खासगी विधेयके मांडण्यात आली. अधिवेशनादरम्यान सभागृहाचे कामकाज सुरळीत पार पाडण्यात सहकार्य केल्याबद्दल लोकसभा अध्यक्षांनी पंतप्रधान, संसदीय कामकाज मंत्री, विरोधी पक्षनेते, विविध पक्षांचे नेते आणि खासदार यांचे आभारही मानले.

### बारा सरकारी विधेयके सादर तर चार मंजूर

या अधिवेशनात १२ सरकारी विधेयके मांडण्यात आली. 'वित्त विधेयक-२०२४', 'विनियोजन विधेयक-२०२४', 'जम्मू आणि काश्मीर विनियोग विधेयक-२०२४' आणि 'भारतीय विमान विधेयक-२०२४' यासह एकूण ४ विधेयके मंजूर झाली. सत्रादरम्यान ८६ तारांकित प्रश्नांची तोंडी उत्तरे देण्यात आली. खासदारांनी तातडीचे सार्वजनिक महत्त्वाचे ४०० मुद्दे मांडले. नियम ३७७ अन्वये सभागृहात ३५८ प्रकरणे मांडण्यात आली. निर्देश ७३ अंतर्गत २५ विधानांसह एकूण ३० विधाने, नियम ३७२ अंतर्गत मंत्र्यांनी सरकारी कामाबाबत संसदीय कामकाज मंत्र्यांची २ विधाने आणि तीन 'सुओ मोटो विधाने' दिली आहेत.

# आ.संदीप क्षीरसागर यांनी पाठिंबा देऊन सोडविले उपोषण

## मुस्लिम समाजाच्या विविध मागण्यांसाठी राणी बाजी यांचे लाक्षणिक उपोषण

**बीड । प्रतिनिधी**

**मुस्लिम समाजाच्या विविध मागण्यांसाठी सामाजिक कार्यकर्त्या शेख गुलरूखजहीण किशवरूद्दीन उर्फ राणी बाजी यांनी राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष तथा मा.सभापत खुर्शिद आलम यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण सुरू केले होते. या उपोषणाला पाठिंबा देत आ.संदीप क्षीरसागर यांनी उपोषण सोडवले.**

बीड येथील सामाजिक कार्यकर्त्या शेख गुलरूखजहीण किशवरूद्दीन उर्फ राणी बाजी यांनी राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष तथा माजी सभापती खुर्शिद आलम यांच्या मार्गदर्शनाखाली मुस्लिम समाजाच्या विविध मागण्यांसाठी बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर गुरूवारी (दि.८) रोजी लाक्षणिक उपोषण सुरू केले होते. यामध्ये मुस्लिम समाजाला सर्व क्षेत्रात १०% आरक्षण देण्यात यावे. मुस्लिम समाजाला पूर्ण आरक्षण मिळेपर्यंत अंतरिम रित्या मा.उच्च न्यायालयाच्या मान्यतेने दिले गेलेले शैक्षणिक क्षेत्रातील ५% आरक्षण पुनर्स्थापित करावे. मुस्लिम समाजासाठी मुस्लिम समाजाला आरक्षण मिळेपर्यंत समाजातील विद्यार्थ्यांना उच्च तंत्रशिक्षण, वैद्यकीय व इतर व्यावसायिक शिक्षणासाठी शैक्षणिक शुल्कामध्ये ५०% सवलत अर्थातच शिष्यवृत्ती देण्यात यावी. मागासवर्गीय सहकारी संस्थेच्या धर्तीवर



अल्पसंख्यांक सहकारी संस्था स्थापना व नोंदणीसाठी कायदा करण्यात यावा. प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी उर्दू घर व मुस्लिम समाजासाठी सांस्कृतिक सभागृह उभारण्यात यावे. न्यायमूर्ती रंगनाथ मिश्रा आयोग, सच्चर समिती, महेमूदकर्ररहेमान समिती या तीन्ही समितींच्या शिफारसीची अंमलबजावणी करण्यात यावी. मुस्लिम समाज संरक्षण कायदा लागू करण्यात यावा. बीड येथे मंजूर झालेल्या अल्पसंख्यांक समाजातील मंजूर असलेल्या मुलींच्या वस्तीगृहाचे तात्काळ काम सुरू करावे. बलभीम चौक येथील जुने तहसील याठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू करावे. अशा विविध मागण्यांसाठी राणी बाजी यांनी उपोषण केले. सदरील उपोषणास आ.संदीप क्षीरसागर यांनी भेट दिली व मागण्यांना पाठिंबा देत उपोषण सोडविले. यावेळी तालुकाध्यक्ष गोरे साहेब,खुर्शीद आलम अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस बीड शहर श.प,हेमाताई पिंपळे,नगरसेवक आमेर आणण,नगरसेवक मोहसीन मोमीन,कांग्रेस शहराध्यक्ष परवेज कुरेशी,शोईब इनामदार,उप सरपंच शाहेद भाई,शेख मोहसीन,मसलेकर सर,करपे सर,सूर्यकांत जोगदंड,लक्ष्मण पाटोळे,लालासाहेब,आमेर पाशा,भागवत वैद्य,शाहीन पठाण,शकीला सैय्यद,सुवर्णा चव्हाण,नसरीनबाजी,समीना बाजी,स्नेहा खंडागळे,गुंगासे मॅडम,नितीनजी जयभाय,मोमीन गफ्फार, अखील इनामदार,मोमीन शहेबाज सह अनेक मान्यवर उपस्थित होते,

# प्रल्हाद तारक यांच्या आशीर्वादाने ग्रामीण भागातील सेवा केंद्र शहरामध्ये

**जालना । प्रतिनिधी**

अंबड मध्ये ग्रामीण भागातील १६ केंद्र सुरू असल्याची माहिती जिल्हा समवयक प्रल्हाद तारक यांनी दिली होती त्या अनुषंगाने बातमी प्रसिद्ध करण्यात आले होते परंतु प्रल्हाद तारक यांच्या आशीर्वादाने ग्रामीण भागातील सीएससी केंद्र शहरांमध्ये सुरू असल्याचे दिसून येत आहे याप्रकरणी जिल्हाधिकारी व निवासी उपजिल्हाधिकारी यांनी प्रल्हाद तारक यांची तात्काळ चौकशी करावे अशी मागणी सर्वसामान्य नागरिक कडून केल्या जात आहे. या संदर्भात प्रल्हाद तारक यांना विचारले असता ते म्हणाले की ग्रामीण भागातील असलेले अंबड शहरांमध्ये सीएससी केंद्र चालकांना नोटीस दिलेले आहे परंतु कारवाई काही होत नाही यावरून असं दिसून येते की सीएससी केंद्र चालक व प्रल्हाद तारक यांच्या संगणमताने जिल्ह्यामध्ये ग्रामीण भागातील सीएससी केंद्र शहरांमध्ये सुरू आहे. यावरून दिसून येत आहे. सदरी चालक केंद्रांना नोटीस देण्यात आली आहे कारवाई करून रद्द करण्यात येणार आहे असे फक्त बोलल्या जात आहे. जालना जिल्हाधिकारी कार्यालयाकडून आपले सरकार सेवा केंद्र आणि आधार केंद्राची तपासणी सुरु करण्यात आली आहे आज पर्यंत किती सीएससी केंद्रावर कारवाई करण्यात आली हे समजू शकले नाही. जालना शहरातील जुनी तहसील कार्यालयातील आधार केंद्र, शनी मंदिर जवळील आपले सरकार सेवा केंद्र, टाऊन हॉल येथील आधार केंद्र, गांधी चमन येथील पोस्ट ऑफिस या ठिकाणी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने तपासणी करण्यात आली. तरी जिल्ह्यातील नागरिकांना चांगली सेवा वेळेत पुरविणे आणि समस्यांचे निराकरण करण्यासाठी आपले सरकार सेवा केंद्रासह आधार केंद्राची तपासणी करण्यात येत आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली आहे. तसेच या प्रकरणी अंबड शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागातील सेवा केंद्र असल्याचे माहिती श्री तारक यांनी दिली आहे ते म्हणाले की ग्रामीण भागातील सेवा केंद्र अंबड शहरात १५ते १६ सुरू आहे त्यांना नोटिसा देण्यात आल्या आहे परंतु यामध्ये सुधारणा होत नाही म्हणून जिल्हाधिकारी यांच्या आदेशावरून कारवाई करून जे ग्रामीण भागातील सेवा केंद्र शहरात सुरू आहे ते रद्द करण्यात येणार आहे अशी माहिती प्रल्हाद तारक यांनी दिली होती. शासनाने निर्धारित केलेल्या शुल्कापेक्षा नागरिकांकडून काही केंद्र चालक जास्त शुल्क आकारत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. केंद्रांवरील ऑपरेटरचे नागरिकांशी असभ्य किंवा अशोभनीय वर्तन आढळल्यास त्यावर योग्य ती कारवाई करण्यात येणार होती परंतु अद्यापर्यंत काही कारवाई झाल्या नसल्याचे समजते. नागरिकांना आदरपूर्वक आणि सन्मानाने सेवा देणे अत्यंत महत्त्वाचे असून सर्व केंद्रांनी दर फलक दर्शनीय भागावर लावलेली असावी तसेच नागरिकांना मागणी करता सहजपणे उपलब्ध करून द्यावी. दर फलक अनुपलब्धतेबाबत तक्रारी आल्यास त्यावर तात्काळ कारवाई करण्यात येणार आहे. सेवा केंद्रांनी त्यांच्या मुळ ठिकाणापासून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर केल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. याबाबत तपासणी करून आवश्यक ती कारवाई केली जाणार आहे. आपले सरकार सेवा केंद्र व आधार केंद्रावर कोणत्याही प्रकारचा त्रास होत असल्यास जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. असे आवाहनही जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे परंतु त्याला सर्वात जबाबदार प्रल्हाद तारक असल्याचे सामान्य नागरिकाकडून बोलल्या जात आहे.

# पोस्टाच्या पार्सलद्वारे आलेल्या ५ तलवारी जप्त ;दोन आरोपींच्या आवळल्या मुसक्या

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील अवैध शस्त्रे बाळगणा-या आरोपींची माहीती घेऊन त्यांचा शोध घेण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यासंदर्भात पोलीस अधीक्षक डॉ. अजय कुमार बंसल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी , उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांचे आदेशावरून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे वेगवेगळी पथके तयार करुन जालना जिल्हा हद्दीतील अवैध शस्त्रे बाळगणा-या आरोपींची माहीती घेऊन शोध घेत असतांना खबऱ्यामार्फत खात्रीशीर माहिती मिळाली की, जालना शहरात इसम मयुर नंदकिशोर मेंढरे याने दिनांक १९/०७/२०२४ रोजी पोस्टाद्वारे काही तलवारी मागविलेल्या आहेत. त्यानुसार मयुर नंदकिशोर मेंढरे, वय-२१ वर्ष, रा. खडकपुरा, जालना याचा शोध घेवुन त्याकडे तलवारीबाबत विचारणा करता त्याने दिनांक १९/०७/२०२४ रोजी मुख्य पोस्ट ऑफीस, जालना येथुन तलवारीचे पार्सल त्याचा मित्र अविनाश सुरज चौधरी, वय-२६ वर्ष, रा. खडकपुरा, बरवार गल्ली, जालना याच्या मदतीने घेतले असल्याचे सांगितले. त्यानुसार दोघांना ताब्यात घेवुन त्यांच्या ताब्यातुन रु.१५०००/- किंमतीच्या पाच तलवारी जप्त करुन सदर बाजार पोलीस ठाणे, जालना येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बंसल व मा.अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी, यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, सपोनि श्री. योगेश उबाळे, सपोनि श्री. शांतीलाल चव्हाण, पोउपनि श्री. राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार सॅम्युअल कांबळे, कृष्णा तंगे, रमेश राठोड, सागर बाविस्कर, लक्ष्मीकांत आडेप, रामप्रसाद पव्हरे, सुधीर वाघमारे, इर्शाद पटेल, सतिष श्रीवास, आक्रुर धांडगे, दत्ता वाघुंडे, संदीप चिंचोले यांनी केलेली.



## पान १वरून...

### मनसैनिकांनी शिवसैनिकांना

दौरा बीड जिल्ह्यात पोहोचला असता, शिवसेना ठाकरे गटाच्या शिवसैनिकांनी राज ठाकरेंचा ताफा अडवण्याचा प्रयत्न केला. यावेळी राज ठाकरे हे जालना रोडवरील हॉटेल अन्विता येथे थांबणार असल्याने त्या दिशेने गाड्यांचा ताफा जात होता. त्याच वेळी उबाठा सेनेचे जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांच्यासह ८ ते १० जणांनी त्यांच्या गाडीसमोर सुपाऱ्या फेकून घोषणाबाजी केली. त्यामुळे मनसैनिक सुध्दा मोठ्या प्रमाणात आक्रमक झाले होते. मनसैनिक आणि तेथे आलेल्या काही शिवसैनिकांमध्ये बाचाबाची होऊन धक्काबुक्की झाल्याचे समजते. यावेळी पोलिसही होते, तरीही गोंधळ चालूच होता. आक्रमक भुमिका घेत मनसैनिकांनी त्या ८ ते १० शिवसैनिकांना अक्षरश: पळवून लावले. या वेळी झालेल्या झटापटीत शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांचा शर्ट फाटल्याचे दिसत होते. पोलिसांनी शिवसैनिकांना ताब्यात घेतल्यानंतर वातावरण शांत झाले. यावेळी मोठ्या प्रमाणात घोषणाबाजी करण्यात आली.

---------

### नीट पीजी परीक्षा ११ ऑगस्ट रोजीच होणार,

पाच याचिकाकर्त्यांच्या सांगण्यावरून आम्ही दोन लाख विद्यार्थ्यांचे करिअर धोक्यात ठेवायचे का? असा सवालही त्यांनी केला. आम्ही याचिकाकर्त्यांमुळे इतक्या उमेदवारांचे करिअर धोक्यात घालू शकत नाही म्हणून आम्ही याचिका स्वीकारत नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

---------

### मुंबईतील महाविद्यालयाच्या हिजाब

सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती संजय कुमार यांच्या खंडपीठाने महाविद्यालयाच्या या निर्णयावर आश्चर्य व्यक्त करत प्रश्न उपस्थित केले. जर एकसमान गणवेश लागू करण्याचा महाविद्यालयाचा हेतू असेल, तर टिळा आणि टिकली यासारख्या धार्मिक चिन्हांवर बंदी का घातली नाही? असा सवाल न्यायालयाने केला. महाविद्यालयाची बाजू मांडणाऱ्या ज्येष्ठ वकील माधवी दिवाण यांनी ही खासगी संस्था असल्याचे सांगितल्यावर न्यायमूर्ती कुमार यांनी महाविद्यालय कधीपासून सुरू आहे, अशी विचारणा केली. २००८ पासून महाविद्यालय अस्तित्वात असल्याचे वकिलांनी सांगितले. मग इतकी वर्षे तुमच्याकडे असे निर्देश का नव्हते आणि अचानक तुम्ही अशा सूचना का जारी केल्या, हे दुर्दैवी असल्याचे न्यायालयाने नमूद केले.

------------

### नगर-बीड-परळी मार्गावरील

मुंडे -खाडे यांनी दरवर्षी बीडच्या रेल्वेसाठी निधी आणून कामाला गती देण्याचे काम केले. विद्यमान खा. बजरंग सोनवणे यांनी सुध्दा निवडूण आल्यावर बीडमध्ये रेल्वेची बैठक लावली होती. शुक्रवारी अंमळनेर ते विघनवाडी या लोहमार्गावर रेल्वेची जलदगती चाचणी यशस्वीरित्या घेण्यात आली. तसेच नगर-बीड-परळी या मार्गावरील सर्वात लांब आणि उंच असलेल्या खोल्याची वाडी येथील पुलावरुन रेल्वे धावली आहे. विघनवाडी रेल्वे स्थानक हे बीडपासून ४३ किमीवर आहे. त्यामुळे येणाऱ्या काही महिन्यात बीडपर्यंत रेल्वे येण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

----------

### आमच्या यात्रेला कोणताच

महाराष्ट्रातील जनता महाविकास आघाडी आणि शरद पवार यांच्या पाठिशी ठाम आहे. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील जनतेने कौल दिला आहे की हे दिल्लीतील सरकार आम्हाला नको आहे. आता राज्यातील हे युती सरकार जाणे हे आपल्या फायद्याचे आहे अशी खात्री जनतेला पटली आहे. त्यामुळे लोकांमध्ये लोकसभेपेक्षा जास्त उत्साह आहे. आमचा हा काही इव्हेंट नाही आम्ही साधेपणाने लोकांपर्यंत जाण्याचा प्रयत्न करत आहोत. आमच्या यात्रेला कोणताही एक रंग नाही, जनतेचा वैविध्यपूर्ण रंग हाच आमच्या यात्रेचा रंग आहे असेही त्यांनी सांगितले.

**महाविकास आघाडीला १७५ पेक्षा अधिक जागा मिळतील**

राज्यात सत्तेवर असलेल्या महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर कितीही घोषणा केल्या तरी भाजप, शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस या तीन पक्षांना एकत्रित फक्त ८० ते ९० पेक्षा अधिक जागा मिळणार नाहीत. लोकसभेपेक्षाही महाविकास आघाडीला वातावरण अनुकूल असून, विधानसभा निवडणुकीत १७५ पेक्षा अधिक जागा मिळतील. असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी व्यक्त केला.

--------------

cmyk

## लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त साहेबराव येरेकर यांचा बीडमध्ये उद्या कार्यक्रम



बीड : शहरात साहित्यारत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती अतिशय उत्साहात साजरी केली जाते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन ग्रुप बीडच्या वतीने सार्वजनिक जयंती साजरी करण्याचा विचार येथील भीमसैनिकांनी केला. मागील वर्षी शितालताई साठे व सचिन माळी यांच्या महायान जलसाचे आयोजन करण्यात आले होते बीड जिल्ह्यात या कार्यक्रमाची चर्चा झाली होती त्याच धर्तीवर पुन्हा एकदा दि.११ ऑगस्ट २०२४ रोजी महाराष्ट्रातील प्रसिद्ध भीमशाहीर साहेबराव येरेकर यांच्या प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील कार्यक्रम हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन बीड या ठिकाणी आयोजित केला आहे. तरी सर्व अनुयायांनी उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन ग्रुप बीड यांनी केले आहे.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार दि. १० ऑगस्ट २०२४



# महायुतीचे वाढकरी मंत्री अब्दुल सत्तार यांच्यामुळे मार्टीची स्थापना

**बीड । प्रतिनिधी**

अल्पसंख्यांक आणि दलित मते दूर गेल्याने लोकसभा निवडणुकीत महायुतीला मोठा फटका बसल्याचे विश्लेषण केले जात आहे. संविधान बदल्याच्या नॅरेटिव्हचा फटका बसल्याचे भाजप, शिवसेना (शिंदे), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार), नेत्यांकडून सांगण्यात येत आहे. त्याा विधानसभेला तीन महिन्यांपेक्षा कमी कालावधी राहिल्याने महायुतीकडून सावध पावले टाकण्यात येत आहे. बुधवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत अल्पसंख्यांक समाजासाठी महत्त्वाचा निर्णय घेऊन राज्यातील अल्पसंख्याक समाजाचा मागासलेपणा दूर करुन त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी टार्टी, बार्टी, सारथी, महाज्योती, अमृतच्या धर्तीवर अल्पसंख्यांक संशोधन व प्रशिक्षण संस्था म्हणजे एमआरटीआयची स्थापना करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला आहे. अल्पसंख्यांक समुदायातील विद्यार्थ्यांना २०२४-२५ पासून विदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना लागू करण्याची घोषणाही अर्थसंकल्पात करण्यात आली होती. तत्पूर्वी, औरंगाबाद येथे अल्पसंख्यांक आयुक्तालय तसेच जिल्हास्तरावर अल्पसंख्यांक कक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आता अल्पसंख्यांक संशोधन व प्रशिक्षण संस्था एमआरटीआय स्थापन करण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. यासाठी नुकत्याच झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत ६ कोटी २५ लाख रुपयांची तरतूद देखील करण्यात आली आहे. तसेच अल्पसंख्यांक संशोधन व प्रशिक्षण संस्थेसाठी (एमआरटीआय) एकूण ११ पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे या संस्थेच्या आस्थापनेवरील पदांचे वेतन, कार्यालयीन खर्च, मागासलेपणाचा अभ्यास करण्यासाठी व प्रशिक्षणासाठी एकूण ६ कोटी २५ लाख रुपयांच्या खर्चासही मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. यासाठी महायुतीच्या सरकार मधील वाडकरी असलेले अल्पसंख्यांक विकासमंत्री अब्दुल सत्तार यांनी आपले राजकीय कौशल्य पणाला लावून हा कठोर निर्णय घेण्यासाठी महायुतीला भाग पाडले आहे. म्हणून राज्यातील समस्त मुस्लिम समाजाच्या वतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, देवेंद्र फडणवीस यांचे जाहीर आभार मानणारे ई-मेल सामाजिक कार्यकर्ते जे.डी.शाह यांनी पाठवले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धिपत्रकात म्हटले आहे की, राज्यातील दोन कोटी मुस्लिम समाजाच्या मतावर निवडून आलेल्या आमदारांना घेऊन सत्तेत सहभागी होऊन उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री झालेल्या अजित पवारांच्या वित्त विभागाकडे अल्पसंख्यांक विभागाने अधिवेशनापुर्वी 'मार्टी'चा प्रस्ताव महायुतीच्या वित्त विभागाकडे मंजुरीसाठी पाठविला होता. मात्र अशा प्रकारच्या संस्थेची आवश्यकता नसल्याचे स्पष्ट कारण सांगत



विभागाच्या या प्रस्तावाला मंजुरी देता येणार नाही. तसेच 'मार्टी'मुळे राज्याच्या तिजोरीवर अतिरिक्त भार पडणार असून याची आवश्यकता नसल्याचा शेरा या प्रस्तावावर महायुतीच्या राज्य सरकाराकडुन मारण्यात आला होता. व विविध समाज घटकांतील विद्यार्थ्यांसाठी स्थापन करण्यात आलेल्या संस्थांचे काम देखील समाधानकारक नसल्याची टिपणी यामध्ये करण्यात आली होती.

राज्यात अनुसूचित जाती, ओबीसी आणि मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत. या संस्थांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेताना येणाऱ्या अडचणी दूर होणार आहे, शैक्षणिक शिष्यवृत्ती, परदेशी शिष्यवृत्ती, व्यावसायिक शिक्षण, व्यवसायासाठी भागभांडवल,

### मार्टीमुळे मुस्लिम विद्यार्थ्यांचे भविष्य उज्वल होईल - जे.डी.शाह

कर्जमाफीसारख्या योजना राबविल्या जातात. याच धर्तीवर अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी 'मौलाना आझाद रिसर्च ट्रेनिंग इन्स्टिट्यूट (मार्टी) ची स्थापना करण्याची मोठ्या प्रमाणात मागणी करण्यात आली होती. नुकत्याच झालेल्या पावसाळी अधिवेशनात अनेक सत्ताधारी व विरोधी आमदारांनी ही मागणी मोठ्या प्रमाणात लावून धरली होती. मात्र महाराष्ट्रातील दोन लाख मुस्लिम विद्यार्थ्यांच्या हिताचा असलेला व भविष्य उज्वल करण्यासाठी हा महत्त्वाचा प्रस्ताव अर्थमंत्री असलेल्या यांच्या वित्त विभागाने अल्पसंख्यांक विकास मंत्री अब्दुल सत्तार यांच्या धडाकेबाज कामगिरीमुळे तत्ताोां स्विकारण्यात आला आहे. यामुळे राज्यातील मुस्लिम समाजाच्या मतदारांमध्ये मोठ्या प्रमाणात आनंद व्यक्त केला जात आहे. राज्य मंत्रिमंडळातील अल्पसंख्यांक मंत्री अब्दुल सत्तार यांनी अधिवेशना दरम्यान मार्टी'च्या मागणीसाठी स्थापन करण्यात आलेल्या कृतीसमितीचे सदस्य शाहबाज पठाण यांनी अधिवेशन काळात आझाद मैदान येथे उपोषण केले होते. अल्पसंख्याक मंत्री अब्दुल सत्तार यांनीच येत्याा १५ दिवसांत 'मार्टी'च्या स्थापनेचा सरकारी आदेश काढणार असल्याचे आश्वासन दिल्याने पठाण यांनी उपोषण सोडले होते. अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी 'मार्टी'ची अत्यांत आवश्यकता आहे. महायुतीचे राज्य सरकार हा पाचशे कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देणार आहे. यामुळे राज्यातील मुस्लिम समाजात आनंद व्यक्त केला जात आहे. कारण राज्यातील प्रत्योक समाजातील मतदारांना भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस महायुती या सत्ताधारी पक्षाच्या बाजूने उभे करण्यासाठी विविध प्रकारच्या योजना राबविण्याचा निर्णय घेतला जात असताना मुस्लिम समाजाच्या दोन लाख विद्यार्थ्यांना खुश करून विधानसभा निवडणुकी पुर्वी मुस्लिम समाजाला महायुतीच्या सरकारने फार मोठा दिलासा दिला आहे. कारण फुले, शाहू, आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्रात समता, बंधुता आणि न्याय भुमिका घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात विविध पक्षांच्या नेत्याांनी आंदोलन करुन महायुतीच्या सरकारावर दबाव आणला होता, त्याांचाच हा परिणाम आहे. 'मार्टी'ची स्थापना करण्याच्या प्रस्तावावर महायुतीच्या मंत्रिमंडळातील अल्पसंख्यांक मंत्री अब्दुल सत्तार यांच्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्या राज्य सरकारने योग्य निर्णय घेऊन विधानसभा निवडणुकी पुर्वी महायुती राज्य सरकारने सहानुभूती पुर्वक पुनर्विचार केल्याने मुस्लिम समाजाच्या विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. कारण डॉ. महेमूदुर्हमान समितीने अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी अशा प्रकारच्या संस्थेची आवश्यकता असल्याचे म्हटले होते. मुस्लिम समाजातील मुलांमध्ये उच्च शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. त्यांना शिक्षणाच्या वाटेवर आणण्यासाठी 'मार्टी'ची आवश्यकता होती. मुस्लिम समाजाने लोकसभा निवडणुकीत जास्तीत जास्त सहभाग घेतल्यामुळे महायुतीच्या सरकारावर दबाव आणून रास्त अपेक्षा पूर्ण केल्याबद्दल विशेषतः अल्पसंख्यांक मंत्री अब्दुल सत्तार यांनी दाखवून दिले की, लग्न कुणाचेही असले तरी वाढेकरी आपला लागतो. म्हणून अल्पसंख्यांक मंत्री अब्दुल सत्तार हे महायुतीच्या सरकारामधील राज्यातील दोन कोटी मुस्लिम समाजासाठी सत्तेतील वाढकरी ठरले आहेत. याचा समस्त मुस्लिम समाजाला सार्थ अभिमान वाटतो परिस्थिती प्रतिकूल असली तरी आव्हाने पेलण्याचे सामर्थ्य आपल्या अंगी आहे म्हणून आपले अभिनंदन करताना समस्त मुस्लिम समाजाला मनस्वी आनंद होत आहे.. असे सामाजिक कार्यकर्ते जे.डी.शाह यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून म्हटले आहे.



दिंद्रुड - धारूर तालुक्यातील बालाघाटच्या डोंगर कुशीत वसलेल्या कचारवाडी या गावात जागतिक आदिवासी दिन शुक्रवारी साजरा करण्यात आला. यावेळी आद्यक्रांतिकारक राघोजी भांगरे व क्रांतिसूर्य जननायक बिरसा मुड़ें यांच्या प्रतिमेचे पुजन करताना बालाघाट तरुण मित्र मंडळ कचारवाडी व ग्रामस्थ उपस्थित होते.

## आरक्षणामुळे आमचं सामाजिक न्यायाचे स्वतंत्र्य अबाधित आहे -पँथर नितीन सोनवणे

**बीड । प्रतिनिधी**

आरक्षणाला विरोध करणाऱ्या राज ठाकरेंनी माफी मागितली नाही. त्यामुळे आम्ही आरक्षण विरोधी चले जाओ चा नारा दिलेला आहे. बीड मध्ये मी आरक्षण विरोधी प्रवृत्तीला चले जाओचे आवाहन केले आहे. आरक्षणाला विरोध करणारे मनुवादी आहेत. त्यांना दलित गुलाम करायचे आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक न्यायाचे धोरण त्यांना मान्य नाही.

जब तक जातीवाद रहेगा, तब तक आरक्षण रहेगा. आरक्षण जिंदाबाद! आम्ही आरक्षणवादी, आम्हाला गर्व आहे आम्ही आरक्षणवादी आहोत.

आज गरीब मराठा संविधानाच्या मार्गाने आरक्षण मागत आहेत. तर राज ठाकरे त्यांना हिनवत आहेत. आम्ही गरीब मराठा, दलित, मुस्लिम एकत्र येऊन जी राजकीय क्रांती केली तिला हे घाबरले आहेत. ते ऐक्य आम्ही तोडू देणार नाहीत. छत्रपती शिवाजी महाराजाच्या खऱ्या मावळ्यानी मराठा आरक्षणाच्या माध्यमातून राजकीय भूमिका घेण्याचा प्रयत हाणून पाडायचे हे धोरण आहे. मराठ्यांनी गैर मावळे नाकारले आहेत, कृष्णाजी भास्कर कुलकर्णी ओळखलेत त्यामुळे यांच राजकीय अस्तित्व धोक्यात आले आहे. जे सोन्या चांदीचा चमचा तोंडात घेऊन, प्रस्तापित उच्च जातीत जन्माला आलेत त्यांना आरक्षण समानता काय कळणार.




पिंपळवंडी:- जि.प. प्रा.शाळा जाधववाडी येथे शाळा व्यवस्थापन समितीचे पुनर्गठन करण्यासाठी पालक सभेचे आयोजन करण्यात आले पालक सभेतून शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी वसुदेव उत्तम जाधव तर उपाध्यक्षपदी आप्पा लक्ष्मण जाधव यांची बिनविरोध निवड करण्यात आली.तसेच याप्रसंगी सर्व पालक उपस्थित होते.तसेच शाळेचे मुख्याध्यापक राजेश पवार सर व सहशिक्षिका श्रीमती राऊत मॅडम उपस्थित होत्याा.याप्रसंगी लहू जाधव, कृष्णा जाधव,देविदास जाधव,गंगाधर जाधव,जयसिंग जाधव,गोविंद जाधव, मच्छिंद्र जाधव आधी सर्व ग्रामस्थांनी अध्यक्ष उपाध्यक्ष यांचे अभिनंदन केले.

## श्री.स्वामी अमृत भारती विद्यालयात उद्या शालेय गणवेश वाटप व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**पिंपळवंडी । प्रतिनिधी**

संत श्री.निवृत्तीनाथ महाराज विश्वस्त मंडळाच्या वतीने व श्री.गंगाभारती महाराज शिक्षण प्रसारक मंडळ संचलित,श्री.स्वामी अमृत भारती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पिंपळवंडी ता.पाटोदाचे रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त विद्यालयात प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी रविवार रोजी सकाळी १०:३० वा.श्री.स्वामी अमृत भारती विद्यालयाच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व शालेय गणवेश वाटपचा कार्यक्रम आयोजित केला असून या कार्यक्रमाला पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी बहुसंख्येने येऊन उपस्थित रहावे असे आवाहन विद्यालयाचे मुख्याध्यापक व शिक्षकांनी केले आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री.ह. भ.प.गुरुवर्य महादेवानंदजी महाराज भारती मठाधिपती श्री.क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थान तथा संस्थापक अध्यक्ष श्री. गंगाभारती महाराज शिक्षण प्रसारक मंडळ हे असतील.तर प्रमुख पाहुणे म्हणून खासदार बजरंग सोनवणे, आ.बाळासाहेब आजबे,मा.आ. सुरेश धस,मा.आ.भिमराव धोंडे तसेच परमेश्वर येवले उद्योजक इंदोर,जगन्नाथ कांबळे छत्रपती संभाजीनगर,अविनाश पाठक जिल्हाधिकारी बीड,नंदकुमार ठाकूर पोलीस अधीक्षक,विश्वंभर गोल्डे उपविभागीय पोलीस अधिकारी बीड, ॲड.एन.एन.साबळे सरकारी वकील बीड,ॲड.नरसिंह जाधव उच्च न्यायालय छत्रपती संभाजीनगर, भाऊसाहेब भवर युवा नेते,जोगदंड सर माजी प्राचार्य,भार्गव सपकाळ सहाय्यक पोलीस निरीक्षक अंमळनेर पोलीस ठाणे,खामकर साहेब पुणे, निलेश मोरे,उद्धवशेठ पवार,दादासाहेब पवार उपसरपंच आदींची उपस्थिती लाभणार आहे.

## गझलकार प्रदीप निफाडकर यांच्या उपस्थितीत रंगणार रोटरी क्लबचा पदग्रहण सोहळा


**माजलगाव । प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटी व इनरव्हील क्लब ऑफ माजलगाव सिटीच्या २०२४-२५ या वर्षाकरिता नवनियुक्त अध्यक्ष व सचिव यांच्या पदग्रहण सोहळा दि १० ऑगस्ट शनिवार रोजी येथील माँ वैष्णवी मंगल कार्यालय माजलगाव येथे वेळ सायंकाळी ६.३० वाजता आयोजित करण्यात आलेला आहे.

सदरील कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गझलकार मा.श्री. प्रदीप निफाडकर, रोटरी ऑफ बीड डिस्ट्रिक चे प्रांतपाल ३१३२ मा.रो.डॉ.सुरेश साबू व रोटरी ऑफ बीड डिस्ट्रिक ३१३२ चे सहा,प्रांतपाल मा.श्री विवेक गंगणे हे आहेत.रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटी २०२४-२५ चे नवनियुक्त अध्यक्ष श्री मंगलनाथ मल्टिस्टेट चे व्यवस्थापकीय संचालक रो.ॲड. रवींद्र कानडे व सचिव रो. सौ.लता जोशी तसेच इनरव्हील क्लब ऑफ माजलगाव सिटी चे नवनियुक्त अध्यक्ष रो. सौ. प्राजक्ता गुंडेवार व सचिव सौ.स्मिता कानडे यांचे पदग्रहण होणार आहे.या कार्यक्रमासाठी माजलगाव शहर व परिसरातील नागरिकांना उपस्थित राहण्याचे आव्हान रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटी चे २३-२०२४ चे अध्यक्ष रो.राजेश देशपांडे,सचिव रो.डॉ.मधुकर घुबडे व इनरव्हील ऑफ माजलगाव सिटी चे २०२३-२४ चे अध्यक्षा रो.सौ.वैशाली वाघमारे व सचिव रो.सौ.मनीषा लंगडे व सर्व सन्माननीय संचालक मंडळ यांनी केले आहे.

रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटी हि १५ व्या वर्षात यशस्वी पदार्पण करत आहे मागील १५ वर्षांमध्ये अनेक समाज उपयोगी कार्यक्रमाचे आयोजन करून सामाजिक बांधिलकीला चालना देण्याचे काम रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटी सातत्याने करत आहे.समाजसेवेचा वसा घेत माजलगाव शहर व परिसरातील नागरिकांसाठी यापुढे देखील विविध योजना राबवण्याचा संकल्प रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटी च्या नवनिर्वाचित अध्यक्ष व सचिव यांनी केली असून पत्रकारांशी बोलताना सांगितले आहे. व कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आव्हान देखील त्यांनी केले आहे.





### अध्यक्षपदी रवींद्र कानडे तर सचिवपदी लता जोशी यांची निवड

## तुलसी महाविद्यालयाचे प्रा.समीर मिर्झा सेट परीक्षा उत्तीर्ण

बीड । प्रतिनिधी

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून ३९ व्या सेट परीक्षेचे आयोजन ७ एप्रिल रोजी करण्यात आले होते. राज्यभरातील विविध शहरातील परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा पार पडली होती. या परीक्षेत येथील देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय बीड येथील प्रा.समीर मिर्झा हे सेट परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. प्रा.समीर मिर्झा यांचा संस्थेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष प्रा.प्रदिप रोडे यांनी सत्कार केला आहे. याप्रसंगी इंजि.दिपांकर रोडे, तुलसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल.एम.थोरात, उपप्राचार्य प्रा. डि.जी.निकाळजे तसेच सर्व प्राध्यापक, कर्मचारी यांची उपस्थिती होती.

सेट परीक्षेसाठी नोंदणी केलेल्या एकूण विद्यार्थ्यांपैकी १ लाख ९ हजार २५० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. यापैकी ७२७३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. एकूण ६.६६ टक्के इतका सेट परीक्षेचा निकाल लागला आहे. सेट परीक्षेत प्रा.समीर मिर्झा यांनी घवघवीत यश संपादन करीत ही परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. त्यांचा संस्थेच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला असून पुढील वाटचालीसाठी प्रा.मिर्झा यांना संस्थेच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.



संस्थेचे अध्यक्ष प्रा.प्रदिप रोडे यांच्या हस्ते प्रा.मिर्झा यांचा सत्कार

## जय जवान माध्य.व उच्च माध्यमिक विद्यालयात जागतिक आदिवासी दिन व क्रांति दिन साजरा

वडवणी । प्रतिनिधी

दि.०९ ऑगस्ट २०२४ रोजी जय जवान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कवडगाव(बू.) तालुका वडवणी जिल्हा बीड विद्यालयात जागतिक आदिवासी दिवस व ऑगस्ट क्रांति दिन कार्यक्रम साजरा करण्यात आला. सदरील कार्यक्रमाची सुरुवात कार्यक्रम अध्यक्ष,प्रमुख पाहुणे,मान्यवर व्यक्ती व उपस्थित सर्व यांच्या हस्ते महान स्वातंत्र्या संग्रामातील अमर क्रांतिकारक हुतात्मे महापुरुष व आदिवासी महान आद्य क्रांतिवीर राघोजी भांगरे,भगवान बीरसा मुंडा यांच्या पावन प्रतिमेस पुष्प हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.सदरील कार्यक्रमास अध्यक्ष,प्रमुख पाहुणे,समस्त कवडगाव ग्रामस्थ,शिक्षण प्रेमी,पालकवर्ग, माजी विद्यार्थी संघ आदी मान्यवर उपस्थित होते.तसेच संस्था अध्यक्षा प्रा.सुशिलाताई मोराळे,सरचिटणीस राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरद पवार ,महाराष्ट्र राज्य यांनी संदेशांद्वारे सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींना ऑगस्ट क्रांति दिन क्रांतिकारकांच्या आदर्श जीवन,कार्याबद्दल सर्वांस संबोधित केले तसेच नागपंचमी व जागतिक आदिवासी दिवस निम्मित हार्दिक शुभेच्छा दिल्या.




## माजलगावच्या सहदुय्यम निबंधक कार्यालयात कार्यालय स्वच्छता व सजावट मोहीम

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाने दरवर्षीप्रमाणे यावर्षी घोषित केलेला महसूल पंधरवडा दि.१ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट दरम्यान जिल्हाभरात साजरा करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने माजलगाव येथील सह दुय्यम निबंधक कार्यालयात सुद्धा महसूल पंधरवाडा कार्यक्रम साजरा केला जात असून यासाठी माजलगावचे सहदुय्यम निबंधक बी.डी.दारेवार हे कार्यक्रम पूर्णत्वास नेण्यासाठी अतोनात प्रयत करत असल्याची दिसून येत आहे.

या महसूल पंधरवड्या निमित्त माजलगाव सहदुय्यम निबंधक कार्यालयात मागील आठ दिवसांपासून स्वच्छता मोहीम राबवत परिसरातील अनावश्यक वाढलेले झाडे-झुडूपे, तण-गवत कर्मचाऱ्यांच्या साहाय्याने काढून परिसर स्वच्छ केला आहे. तसेच कार्यालयातील भिंतींना रंगरंगोटी करून भिंतीवर शासनाच्या विविध योजनांचे व माहितीचे फलक लावण्यात आलेले आहेत व कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना शासनाच्या या विविध योजनांची माहिती स्वतः सहदुय्यम निबंधक बी.डी.दारेवार हे देत आहेत. तसेच संपूर्ण सहदुय्यम निबंधक कार्यालयात कृत्रिम फुलांची सजावट करून महसूल पंधरवडा खूप जल्लोषाने साजरा करण्यात येत असल्याचे दिसून आले. दिनांक १ ऑगस्ट १५ ऑगस्ट या दरम्यान महसूल पंधरवाडा कार्यक्रमाचे योग्य नियोजन हे सहदुय्यम निबंधक कार्यालय माजलगाव येथे होत आहे. हा कार्यक्रम १५ ऑगस्टपर्यंत यशस्वी करण्यासाठी सहदुय्यम निबंधक बी.डी.दारेवार यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यालयातील कर्मचारी वरिष्ठ लिपिक गणेश चौधरी,कनिष्ठ लिपिक विनोद मुनेश्वर,ऑपरेटर नामदेव लटपटे,सिद्धेश्वर बोबडे हे मेहनत घेत आहेत.



पान ६ वरून...

### वैद्यकिय महाविद्यालयाच्या मागणीला

करून द्यावे. जिल्ह्याला कुठलीही कमतरता भासणार नाही, असे सांगत जिल्हाभरातील आरोग्यव्यवस्था व इतर बाबींवर त्यांच्याशी विस्तृत चर्चा केली.बीड जिल्ह्यातील आरोग्य विभागातील अडचणींवर लवकरच प्रभावी निर्णय घेऊन उपाय करू, शासकीय वैद्यकीय महाविद्यालया संदर्भात देखील शासन गांभीर्यपूर्वक विचार करेल, असा विश्वास मंत्री जगतप्रकाश नड्डा यांनी दिला. लोकसभा निवडणूकीचा निकाल लागल्यानंतर खा.सोनवणे यांनी जिल्हाभर हार-तुरे करत बसण्यापेक्षा कामाला महत्व दिले असून जिल्ह्यातील नागरिकांच्या दृष्टीने महत्वाचे असलेले आरोग्य विभागातील प्रश्न ते मांडत आहेत. या निमीत्ताने जिल्हा आरोग्य यंत्रणेत बदल होईल, असे दिसत आहे.

cmyk

cmyk

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
शनिवार दि.१० ऑगस्ट २०२४
४

# महामेष योजनेत बदल; मेंढपाळ लाभार्थी रक्कम थेट खात्यात जमा होणार

राजे यशवंतराव होळकर महामेष योजना राज्यातील मेंढपाळांसाठी पुढे सुरू ठेवण्याचा आणि मेंढपाळ लाभार्थींना रक्कम थेट खात्यात जमा करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत नुकताच घेण्यात आला होता. सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पीय भाषणात तत्कालीन अर्थमंत्री यांनी योजनेची फलश्रुती लक्षात घेऊन व्याप्ती वाढविण्याबाबत नंतर विचार करण्यात येईल, असे घोषित केले होते. सदर योजनेत महामंडळाकडे सध्यास्थितीत प्रलंबित/प्रतिक्षाधिन अर्ज व महामंडळाकडे उपलब्ध असलेला निधी विचारात घेवून ही योजना पुढे चालु ठेवण्यास मंत्रिमंडळाने दि.२३ जुलै २०२४ रोजी मान्यता दिली होती. त्यानुसार शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

राज्यातील धनगर समाजातील मागासलेपण दूर करण्याच्या उद्देशाने ही योजना २०१७ वर्षापासून सुरु आहे. या योजनेत अधिकाधिक लाभार्थींना फायदा व्हावा म्हणून काही बदलासह त्यास मान्यता देण्यात आली. या वर्षासाठी महामंडळाकडे असलेल्या २९ कोटी ५५ लाख इतका निधी चालू वित्तीय वर्षात खर्च करण्यास आणि त्यानंतर ही योजना दरवर्षी अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार पुढे चालू ठेवण्यात येईल. पशुधन खरेदीच्याबाबतीत ७५ टक्के अनुदानाची रक्कम ७ दिवसात थेट लाभ हस्तांतरण प्रक्रीयेतून लाभार्थींना देण्यात येईल. तसेच चारा बियाणे व बहुवार्षिक गवत प्रजातीचे



ठोंबे व बियाणे यासाठीचे अनुदान वगळता उर्वरित सर्व लाभ डीबीटीच्या माध्यमातून लाभार्थींना देण्यात येतील.

योजनेत झालेले बदल : धनगर व तत्सम समाजास सामाजिक व आर्थिक स्थैर्य प्राप्त करुन देण्यासाठी शासन निर्णय अन्वये लागू करण्यात आलेली ''राजे यशवंतराव होळकर महामेष योजना यापूढे चालू ठेवण्यात येत आहे. या योजनेसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाकडे अखर्चित असलेला रु. २९.५५ कोटी इतका निधी चालु वित्तीय वर्षात खर्च करण्यात यावा. तसेच पुढील वर्षापासून उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतुदीच्या मर्यादेत लाभार्थ्यांना लाभ देण्यात येईल. या योजनेतील लाभार्थ्यांचा प्रतिसाद विचारात घेऊन लाभार्थी उद्दिष्टे तसेच आर्थिक उद्दिष्टे यामध्ये अंतर्गत बदल करण्याचे अधिकार प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आले आहे. सदर योजनेंतर्गत लाभार्थ्यांना वाटप करण्यात येणारे पशुधन (मेंढ्या व नर) यांची लाभार्थ्यांने प्रथम स्वखर्चातून महामंडळाच्या प्रक्षेत्रावरुन अथवा जनावरांच्या अधिकृत बाजारातून खालील समितीच्या उपस्थितीत खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली आहे. संबंधित जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांनी खरेदी करण्यात आलेल्या पशुधन खरेदीच्या मुळ पावत्या तसेच खरेदी केलेले पशुधन व खरेदी समितीच्या एकत्रित फोटोसह खरेदी अहवाल पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ लिमिटेड, पुणे यांना सादर कराव्यात. व्यवस्थापकीय संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ लिमिटेड, पुणे यांना कागदपत्रे सादर केल्यानंतर ७५ टक्के अनुदानाची रक्कम ७ दिवसात थेट लाभ हस्तांतरण प्रक्रियेच्या माध्यमातून लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात येईल. सदर योजनेंतर्गत लाभार्थ्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ लिमिटेड, पुणे यांच्या प्रक्षेत्रावरुन देण्यात येणाऱ्या चारा बियाणे व बहुवार्षिक गवत प्रजातीचे ठोंबे/बियाणे यासाठीचे अनुदान वगळता उर्वरित सर्व बाबींचे लाभ पूर्वीप्रमाणेच थेट लाभ हस्तांतरण प्रक्रियेच्या माध्यमातून लाभार्थ्यांना देण्यात येईल.

## अजित पवारांनी कांदा उत्पादकांची मागितली माफी

नाशिक : लोकसभा निवडणुकीत कांदापट्ट्यात महायुतीला शेतकऱ्यांनी इंगा दाखवला होता. त्यावरून आता कांदा निर्यातबंदी करायची नाही, यावर आमचे एकमत झाल्याचे सांगत राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांनी कांदा उत्पादकांची नाशिकमधील सभेत जाहीर माफी मागितली आहे. अजित पवारांनी विधानसभेची निवडणुक डोळ्यासमोर ठेवून राज्यात जनसन्मान यात्रा काढली आहे. नाशिकमध्ये याच जनसन्मान यात्रेत शुक्रवारी (दि.९) अजित पवार बोलत होते. यावेळी त्यांनी हात जोडून शेतकऱ्यांची माफी मागितली.

पवार म्हणाले, ''आता आम्ही त्यांना (केंद्र सरकार) सांगितला आहे की, कांदा निर्यात बंदी करायची नाही. लोकसभेला जो झटका दिला तो लईच लागलाय. पार कंबरच मोडायची वेळ आली. परंतु माफ करा. चूक झाली मान्य करतो.'' असे म्हणत अजित पवारांनी हात जोडून कांदा उत्पादकांची माफी मागितली आहे. केंद्र सरकारने लोकसभेच्या निवडणुकीपूर्वी केंद्र सरकारनं कांदा निर्यातबंदी केली. कांदा उत्पादकांची मेहनत वाया गेली. त्यामुळे शेतकरी नाराज होते. कांदा उत्पादकांनी लोकसभेच्या निवडणुकीत राज्यातील महायुती सरकारला झटका दिला होता. निकालानंतर मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी कांदा, सोयाबीन, कापूस प्रश्न भोवल्याची कबुली दिली होती. विधानसभेची निवडणुक ऑक्टोबर



महिन्यात येऊ घातली आहे. त्यामुळं कांदा उत्पादकांची नाराजी दूर करण्यासाठी अजित पवारांनी जाहीर सभेत आश्वासन दिले आहे. पुढे पवार म्हणाले, ''मी कांदाप्रश्नी ज्यांना भेटायला पाहिजे त्यांना भेटलो. एकनाथ शिंदे, देवेंद्रजी, कृषिमंत्री धनंजय मुंडे आमच्या सगळ्यांचे एकमत झाले आहे.'' असाही पवार यांनी दावा केला. परंतु अद्यापही केंद्र सरकारने कांद्यावरील निर्यातशुल्क तर किमान निर्यातमूल्य कायम ठेवलेले आहे. दरम्यान, केंद्र सरकारने सहा महीने कांद्यावर निर्यातबंदी घालून ऐन आवकेच्या हंगामात शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले. शेतकरी निर्यातबंदी उठवण्याची मागणी करत होते मात्र तरीही केंद्र सरकारने त्याची दखल घेतली नाही. त्याऐवजी केंद्र सरकारने कर्नाटक आणि गुजरातच्या कांदा निर्यातीला मोकळीक दिली होती. शेवटी कांदापट्ट्यात झटका बसू शकतो, अशी चिन्हं दिसू लागल्यावर निर्यात बंदी उठवली. परंतु किमान निर्यात मूल्याची पाचर मारून ठेवली.

## पाणी परीक्षण करण्याची पद्धत

पाणी परीक्षण म्हणजे पाण्यातील क्षारांचे प्रमाण व इतर पाण्यामध्ये असलेले घटक माहिती करून घेण्यासाठी आपण प्रयोग शाळेमध्ये पाणी तपासतो त्याला पाणी परीक्षण असे म्हणतात. शेतकरी बांधवानो, आपण सर्वांना माती परीक्षण बद्दल तर माहितीच आहे व आपण माती परीक्षण हे करतो, पण भरपुर शेतकरी यांना पाणी परिक्षणबद्दल कमी माहिती असून पाणी परिक्षण कोणी करत नाही. पाणी परीक्षण करणे हे किती गरजेचे आहे आणि ते कसे केले जाते याची माहित असणे गरजेचे आहे. पिकाची गुणवत्ता ही मातीच्या गुणवत्ते वर अवलंबून असते, तर मातीची गुणवत्ता ही पाण्याच्या गुणवत्ते वर अवलंबून असते. म्हणजेच पाण्याची गुणवत्ता ही पिकाच्या गुणवत्ते वर चांगला किंवा वाईट परिणाम करू शकते.



पाणी निरिक्षण करण्याची आवश्यकता : पाण्यातील क्षारता समजण्यासाठी व कमी व जादा प्रमाणातील क्षारांवर योग्य तो उपाय करण्यासाठी. पाण्याचा सामू जाणून घेण्यासाठी. पिकाला पाण्याचे नियोजन ठरविण्यासाठी. पाण्यापासून होणारे संभाव्य धोके अथवा फायदे यांचा अंदाज येण्यासाठी. या निदानांवरुन कोणत्या प्रकारचे पिक जमिनीस योग्य आहे हा निष्कर्ष काढता येतो. ड्रीप मधून द्यावयाची खताची मात्रा चे अचूक नियोजन करता येते. बहुमोल पाण्याचे नियोजन व बचत शक्य होते.

पाणी नमुना कसा घ्यावा : विहिरीतील पाण्याचा वापर मोटार पंप द्वारे करण्यात येत असेल तर पाणी ज्या दिवशी शेतीसाठी वापरण्यात येईल त्याचे दुसरे दिवस सकाळी दहा ते पंधरा मिनिटं मोटर पंद्वारे पाण्याचा उपसा करून टाकावे त्यानंतर जी बाटली वापरणार आहोत ती त्याच पाण्याने स्वच्छ धुऊन एक लिटर पाण्याचा नमुना गोळा करावा. विहिरीतील पाणी पंपा व्यतिरिक्त अन्य प्रकारे वापरण्यात येत असेल तर ज्या दिवशी शेतीसाठी पाणी वापरण्यात येईल त्याचे दुसरे दिवशी सकाळी विहिरीतील पाणी बादलीने ढवळून काढावे. दहा बादल्या बाहेर फेकल्यानंतरच पाण्याचा नमुना एक लिटर बादली मध्ये गोळा करावा. नदी,कालवा व तलावा पासून पाण्याचा नमुना घेताना तो काठा पासून दूर किंवा मध्य प्रवाहातून घ्यावा.

पाण्याचा नमुना घेताना कोणती काळजी घ्यावी ? धातूच्या भांड्यांचा वापर नमुना घेण्यासाठी करू नये. पाण्याच्या नमुन्यासाठी घेण्यात येणारी काचेची अगर प्लास्टिकची बादली कोणत्याही औषधी द्रव्य, कीटकनाशक, जंतुनाशक इत्यादीची असू नये. काचेची किंवा प्लास्टिकची बादली स्वच्छ पाण्याने बऱ्याच वेळी धुवावी मात्र धुताना कोणत्याही सोड्याचा,पावडरचा अगर राखेचा वापर करू नये. पाणी नमुना गोळा केल्यावर प्रयोगशाळे कडे तपासणीसाठी २४ तासाचे आत प्राप्त होईल अशा बेताने पाठवावा.


खालील माहितीसह पाण्याचा नमुना प्रयोगशाळेत पाठवावा : शेतकऱ्याचे नाव व पूर्ण पत्ता. शेतीचा सर्वे क्रमांक. विहिरीचे ठिकाण, पाण्याची पातळी. नमुना घेतल्याची तारीख. जमिनीची माहिती हलकी, मध्यम, भारी. जमिनीचा उतार-प्रकार, उतार, खोली. मागील हंगामातील पीक. रासायनिक खतांचा वापर.

पाणी परीक्षण कुठे करतात? : कृषी विभाग माती व पाणी परीक्षण प्रयोगशाळा. कृषी महाविद्यालय माती व पाणी परीक्षण प्रयोगशाळा. खासगी माती व पाणी परीक्षण प्रयोगशाळा. कृषी विज्ञान केंद्र माती व पाणी परीक्षण प्रयोगशाळा

# गाजर गवत निर्मुलनासाठी मेक्सिकन भुंग्यांचा वापर!

खरीप हंगामात किडी आणि रोगाप्रमाणेच तणांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात होतो. विशेषतः गाजर गवताचा प्रसार मोठ्या प्रमाणात होतो. यामुळे पिकांचे तर नुकसान होतेच शिवाय हे गवत जनावरांच्या खाण्यात आल्यास त्यांना सुद्धा वेगवेगळे आजार होतात किंवा विषबाधा होऊ शकते. गाजर गवताचे शास्त्रीय नाव पार्थेनियम हिस्टिरोफोअर्स असे आहे. याला काँग्रेस गवत, पांढरफुली, चटकचांदणी अशा नावांनी सुद्धा ओळखले जाते. गाजर गवत नियंत्रणाचे वेगवेगळ्या पद्धती आहेत, यात मेक्सिकन भुंग्यांचा वापर सुद्धा केला जातो.

मेक्सिकन भुंगेमार्फत गाजर गवत निर्मूलन : मेक्सिकन भुंगे ज्यांना झायगोग्रामा बायकोलरॅटा या नावाने सुद्धा ओळखतात. या किडीचे प्रौढ भुंगे मळकट पांढरे असून त्यावर काळसर रंगाच्या सरळ आणि नागमोडी रेषा असतात. मादी भुंगे अलग अलग अथवा गुच्छात पानाच्या खालील बाजूवर अंडी घालतात. अंड्यातून बाहेर निघालेल्या अळया गाजर गवताच्या वरील भागातील पाने खातात. अळीच्या ४ अवस्था असून पूर्ण वाढलेल्या अळया रंगाने पिवळ्या असतात. अळी अवस्था १० ते ११ दिवसांची असते, कोषावस्था ९ १० दिवसांनी असते. कोषावस्थेत मातीत गेलेले भुंगे जमिनीतून निघून गाजर गवताच्या पानावर उपजीविका करतात. तरुण अळया झाडाची वाढ



व फुले येण्याचे थांबवितात. पावसाळ्यात जून ते ऑक्टोबर पर्यंत हे भुंगे गाजर गवत फस्त करतात. नोव्हेंबर नंतर हे भुंगे जमिनीत ७ ते ८ महिने दडून बसतात आणि पुढील वर्षी सुरुवातीच्या पावसानंतर जमिनीतून निघून गाजर गवताचा नाश करण्यास सुरुवात करतात. हे भुंगे एखाद्या ठिकाणी स्थिर झाले की पुढच्या वर्षी पुन्हा पुन्हा भुंगे सोडण्याची गरज पडत नाही.

भुंगे कोठे व किती सोडावेत : शेतात प्रति हेक्टरी ५०० भुंगे सोडावेत. मनुष्यप्राण्याचा अडथळा / शिरकाव नाही, अशा जागी भुंगे सोडणे योग्य असते. प्रभावी नियंत्रणासाठी रेल्वे व राज्य रस्त्याच्या दोन्ही बाजूने पडीक जमिनीत, बसस्थानकाजवळीत मोकळ्या जागेत सोडावे. भुंगे दिवसा कार्यरत असल्यामुळे जमा करणे योग्य नाही. सकाळी अथवा सायंकाळी भुंगे जमा करण्यास योग्य काळ आहे. यावेळी मेक्सिकन भुंगे गोळा करून इच्छित स्थळी किंवा शेतात सोडावे. प्रयोगशाळेत प्लास्टिकच्या ६ ९ इंच आकाराच्या डब्यात. शेतात १० १० फुट अथवा १० १५ फुट आकाराच्या मच्छरदाणीत कृत्रिमरित्या गाजर गवतावर भुंग्याने गुणन करतात. नव्या जागी भुंगे सोडण्यासाठी कसे पाठवावे : भरपूर भुंगे असलेल्या गवतावरील ५०० १००० भुंगे १० १५ सें.मी. उंच प्लास्टिकच्या बाटलीत टोपणास जाळी असलेले झाकण लावावे. बाटलीत गाजर गवताचा पाला खाद्य म्हणून टाकावा.भुंग्याचा इतर पिकांना व मानवाला उपद्रव होतो का? : जैविक कीड नियंत्रण संचालनालय बंगलोरच्या चाचणी नुसार हे मेक्सिकन भुंगे इतर पिकांना व मनुष्यप्राण्याला सुरक्षित आहेत. भुंगे व अळया फक्त गाजर गवतच खातात. गाजरगवत उपलब्ध नसल्यास भुंगे जमिनीत सुप्तावस्थेत जातात. रासायनिक तणनाशकांऐवजी मेक्सिकन भुंग्यांचा वापर हा आर्थिक आणि पर्यावरणाच्या दृष्टीने खूप फायद्याचा आहे. तसेच गाजरगवत हे विषारी असल्याने ते उपटण्यासाठी मजूर वर्ग सहज तयार होत नाही. त्यामुळे जैविक नियंत्रण अत्यंत महत्त्वाचे ठरते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६७५ : चार्ल्स (दुसरा) याने ग्रीनीच येथील जगप्रसिद्ध वेधशाळेचा शिलान्यास केला.
१८१० : 'स्मिथसोनियन इन्स्टिट्युशन' ची स्थापना झाली.
१८२१ : मिसुरी हे अमेरिकेचे २४ वे राज्य बनले.
१९८८ : दुसर्या महायुद्धात बेकायदेशीरपणे बंदिवासात टाकलेल्या किंवा हद्दपार केलेल्या जपानी वंशाच्या अमेरिकन नागरिकांना राष्ट्रपती रोनाल्ड रेगन यांनी प्रत्येकी २०,००० डॉलर भरपाई देण्याचे कबूल केले.
१९९० : मॅगेलान हे अंतराळयान शुक्रावर पोचले.
१९९९ : औषधांच्या दुकानांत विकल्या जाणार्या औषधांत प्राणिज पदार्थ असल्यास त्याचा उल्लेख वेष्टणावर करणे अनिवार्य असल्याचा केंद्रसरकारच्या सामाजिक न्याय खात्याचा निर्णय. सामिष
१९९९ : 'इंडियन फिजिक्स असोसिएशन' तर्फे देण्यात येणारा 'डॉ. मो. वा. चिपळोणकर स्मृती पुरस्कार' डॉ. निवास पाटील व डॉ. प्रकाश तुपे यांना जाहीर

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७५५ : नारायणराव पेशवा ५ वा पेशवा (मृत्यू: ३० ऑगस्ट १७७३)
१८५५ : 'गान सम्राट' उस्ताद अल्लादियाँ खाँ जयपूर -अत्रौली घराण्याचे संस्थापक व कोल्हापूर दरबारचे प्रसिद्ध गायक (मृत्यू: १६ मार्च १९४६)
१८६० : पं. विष्णू नारायण भातखंडे संगीतशास्त्रकार, हिन्दुस्थानी संगीताचे प्रसारक, संशोधक व गांधर्व महाविद्यालयाचे एक संस्थापक (मृत्यू: १९ सप्टेंबर १९३६)
१८७४ : हर्बर्ट हूव्हर अमेरिकेचे ३१ वे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: २० आक्टोबर १९६४)
१८९४ : व्ही. व्ही. गिरी भारताचे चौथे राष्ट्रपती, लोकसभा सदस्य आणि केंद्रीय मंत्री (मृत्यू: २३ जून १९८०)
१९०२ : नॉर्मा शिअरर कॅनेडियन अमेरिकन अभिनेत्री (मृत्यू: १२ जून १९८३)
१९१३ : डॉ. अमृत माधव घाटगे संस्कृत व प्राकृत विद्वान (मृत्यू: ८ मे २००३)
१९६० : देवांग मेहता भारताच्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील एक अग्रणी व्यक्तिमत्त्व आणि नॅशनल असोसिएशन ऑफ सॉफ्टवेअर अँड सर्विस कंपनीज चे अध्यक्ष (मृत्यू: १२ जुलै २००१)

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९४२ : हुतात्मा शिरीषकुमार (जन्म: २८ डिसेंबर १९२६)
१९५० : खेमचंद प्रकाश संगीतकार (जन्म: १२ डिसेंबर १९०७)
१९८० : जनरल ह्याह्याखान पाकिस्तानचे ३ रे राष्ट्राध्यक्ष (जन्म: ४ फेब्रुवारी १९१७)
१९८२ : मनाली कल्लट तथा एम. के. वैणू बाप्पा भारतीय खगोलशास्त्रज्ञ. तार्यांची प्रत आणि त्यांच्या वर्णपटातील परस्परसंबंधांची उकल केली. (जन्म: १० एप्रिल १९२७)
१९८६ : जनरल अरुणकुमार वैद्य यांची अतिरेक्यांनी पुणे येथे हत्या केली. १९६५ आणि १९७१ च्या भारत पाकिस्तान युद्धात अतुलनीय शौर्य गाजवल्याबद्दल त्यांना 'महावीरचक्र' मिळाले होते. त्यांच्या लष्करप्रमुखपदाच्या काळातच 'ऑपरेशन ब्ल्यू स्टार'ची कारवाई झाली होती. (जन्म: २७ जानेवारी १९२६)
१९९२ : लेफ्टनंट जनरल शंकरराव पांडुरंगराव (पाटील) तथा एस. पी. पी. थोरात यांचे निधन. संयुक्त राष्ट्रसंघाने शांतता प्रस्थापनेसाठी कोरियात पाठवलेल्या शांतिसेनेचे ते सेनापती होते. कीर्तिचक्र, पद्मश्री, सावरकर पुरस्कार असे अनेक मानसन्मान त्यांना मिळाले होते. (जन्म: १२ ऑगस्ट १९०६)
१९९७ : नारायण पेडणेकर कवी व नाट्यसमीक्षक (जन्म:)
२०१२ : सुरेश दलाल साहित्य अकादमी पुरस्कार विजेते गुजराथी कवी, लेखक आणि संपादक (जन्म: ११ आक्टोबर १९३२)

## कामगंध सापळे उपयोग आणि फायदे



मादी किडीचा विशिष्ट गंध असलेली गोळी लावलेला एक कृत्रिम सापळा म्हणजे कामगंध सापळा होय. कामगंध सापळ्यांचा वापर कसा करावा ? : पिकानुसार कामगंध सापळे आणि ल्युर खरेदी करावी. पीक शाखिय वाढीच्या अवस्थेत असताना ट्रॅप लाऊन त्या मध्ये ल्युर बसऊन टाकावी. ल्युर बसवताना प्लॅस्टिक मोजे वापरावे. किडीचे निरीक्षण करण्यासाठी एकरी ५ ते ६ कामगंध सापळे आणि नियंत्रण करण्यासाठी १० ते १५ सापळे लावावेत. ट्रॅप मध्ये अडकलेल्या किडी (पतंग) वारंवार काढून नष्ट कराव्यात. ४० ते ४५ दिवसांनी ल्युर बदलणे गरजेचे आहे. पावसाळ्यात हा कालावधी कमी असू शकतो. कामगंध सापळ्यांचा फायदा : फवारणी खर्च कमी होतो. सेंद्रिय शेतीसाठी खूप फायदा होतो. किडीची पुढील सर्व पिढी नियंत्रणात येऊ शकते. फवारणीची संख्या देखील कमी होते.

cmyk

# ग्रामीण रूग्णालय जागेचा प्रश्न मार्गी, लवकरच कार्यान्वित होणार

वडवणी । प्रतिनिधी

शहराला तालुक्याचा दर्जा मिळवून दोन तप उलटला मात्र शहराच्या मुलभुत सुविधा चा प्रश्न ऐरणीवर अडकला होता . शहरातील व तालुक्यातील लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. ग्रामीण भागातील तसेच शहरातील नागरिकांना आरोग्य सुविधा घेण्यासाठी शहरापासून १ कि.मी अंतरावर जावे लागत आहे. शहरातील नागरिकांच्या आरोग्य विषय अडचणी लक्षात घेऊन वर्षांपूर्वी आ.प्रकाश सोंळके यांनी सन २०१४ ला वडवणी शहराला ग्रामीण रूगणालय मंजूरी घेतली.मात्र मंजुरी मिळवून अनेक वर्षे झाली तरी ग्रामीण रूगणालयाचा प्रश्न जागे अभावी रखडलेला होता मात्र नगराध्यक्ष शेषेराव जगताप यांनी सतत प्रयत्न करीत जागेचा प्रश्न मार्गी लावला असल्याने ग्रामीण रुग्णालय उभारणी चा मार्ग सोयीस्कर झाला आहे.

वडवणी तालुक्यात एकुण दोन प्राथमिक आरोग्य केद्र आहे.मात्र शहरातील प्राथमिक आरोग्य केद्र हे शहरापासून दुरू असल्याने

## शहरासाठी ग्रामीण रूग्णालय आवश्यक
## १०८ अॅबुल्न्स ची शहरासह ग्रामीण भागात गरज
## आ.सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली जगताप यांचे प्रयत्न



रूग्णांची गैरसोय होत आहे.वडवणीच्या नागरिकांनी पंधरा वर्षापासून ग्रामीण रुग्णालय उभारण्याची मागणी प्रशासनाकडे लावून धरल्यावर कशीबशी शहरात ग्रामीण रूगणालय मंजूरी मिळाली.मात्र जागे अभावी वडवणीकरांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न अटकला आहे.याबाबत शेषेराव जगताप यांनी प्रशासकीय पातळीवर वारंवार याबाबत पाठपुरावा केल्याने व जागेच्या प्रश्नावर तोडगा काढत प्राथमिक आरोग्य केंद्र ची जागा ही जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या नावे करून ग्रामीण रुणालय चा जागेचा प्रश्न मार्गी लावला आहे.

यामुळे रुग्णांची गैरसोय टळणार आहे. याबाबत नगरपंचायत च्या नगराध्यक्षा सौ वंदना शेषेराव जगताप म्हणाल्या की शहराची वाढती लोकसंख्या पाहता वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी ग्रामीण रूग्णालय गरजेचे आहे. या साठी सातत्यपूर्ण पाठपुरावा करत असून ग्रामीण रूग्णालय तातडीने सुरू करण्यासाठी आ.प्रकाश सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली जागेचा प्रश्न मार्गी लागला आहे. सर्व आडथळे दुर करत लवकरच रूग्णालय कार्यान्वित होईल असा विश्वास आहे. याबाबत अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ लक्ष्मीकांत तांदळे म्हणाले की , वडवणी शहरातील ग्रामीण रुणालय बाबत जागेचा प्रश्न उपस्थित झाला होता तो अडथळा आज दुर झाला असून ग्रामीण रुग्णालय तातडीने कार्यान्वित करण्यासाठी पाठपुरावा सुरू आहे.

## देशाचे स्वातंत्र्य अबाधित ठेवणे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य-प्राचार्य हांगे



पाटोदा । प्रतिनिधी

अनेक वर्षे गुलामीत खितपत पडलेल्या भारताला कित्येक स्वातंत्र्यवीरांनी चळवळीच्या व बलिदानाच्या माध्यमातून मिळवून दिलेले स्वातंत्र्य अबाधित ठेवणे हे प्रत्येक नागरिकाचे आद्यकर्तव्य आहे असे प्रतिपादन प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांनी केले. येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने ९ ऑगस्ट रोजी क्रांतिदिनाच्या निमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात ते अध्यक्षीय समारोप करताना बोलत होते.

व्यासपीठावर उपप्राचार्य प्रो. सतिष माउलगे, उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड, कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ. रामचंद्र पवार उपस्थित होते. कार्यक्रमात सर्वप्रथम क्रांतिवीर भगतसिंग यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पमाल्यार्पण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. अशोक नागरगोजे यांनी केले. याप्रसंगी प्रो. हमराज उईके यांनी क्रांतिदिनानिमित्त प्रेरणागीत सादर केले. प्रमुख मार्गदर्शनात इतिहास विभागप्रमुख डॉ. रामचंद्र पवार यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळ, जागतिक महायुद्धे, चले जाव चळवळ व क्रांतीदिनाचे महत्व याविषयी सविस्तर विवेचन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. सोमनाथ लांडगे यांनी केले. आभारप्रदर्शन डॉ. प्रकाश फड यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

# सहदुय्यम निबंधक कार्यालयात कार्यालय स्वच्छता व सजावट मोहीम

## सहदुय्यम निबंधक कार्यालयात रंगरंगोटी व आकर्षक सजावट



माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाने दरवर्षीप्रमाणे यावर्षी घोषित केलेला महसूल पंधरवडा दि.१ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट दरम्यान जिल्हाभरात साजरा करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने माजलगाव येथील सह दुय्यम निबंधक कार्यालयात सुद्धा महसूल पंधरवाडा कार्यक्रम साजरा केला जात असून यासाठी माजलगावचे सहदुय्यम निबंधक बी.डी.दारेवार हे कार्यक्रम पूर्णत्वास नेण्यासाठी अतोनात प्रयत्न करत असल्याची दिसून येत आहे.

या महसूल पंधरवड्या निमित्त माजलगाव सहदुय्यम निबंधक कार्यालयात मागील आठ दिवसांपासून स्वच्छता मोहीम राबवत परिसरातील अनावश्यक वाढलेले झाडे-झुडूपे, तण-गवत कर्मचाऱ्यांच्या साहाय्याने काढून परिसर स्वच्छ केला आहे. तसेच कार्यालयातील भिंतींना रंगरंगोटी करून भिंतीवर शासनाच्या विविध योजनांचे व माहितीचे फलक लावण्यात आलेले आहेत व कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना शासनाच्या या विविध योजनांची माहिती स्वतः सहदुय्यम निबंधक बी.डी.दारेवार हे देत आहेत. तसेच संपूर्ण सहदुय्यम निबंधक कार्यालयात कृत्रिम फुलांची सजावट करून महसूल पंधरवडा खूप जल्लोषाने साजरा करण्यात येत असल्याचे दिसून आले. दिनांक १ ऑगस्ट १५ ऑगस्ट या दरम्यान महसूल पंधरवाडा कार्यक्रमाचे योग्य नियोजन हे सहदुय्यम निबंधक कार्यालय माजलगाव येथे होत आहे. हा कार्यक्रम १५ ऑगस्टपर्यंत यशस्वी करण्यासाठी सहदुय्यम निबंधक बी.डी.दारेवार यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यालयातील कर्मचारी वरिष्ठ लिपिक गणेश चौधरी,कनिष्ठ लिपिक विनोद मुनेश्वर,ऑपरेटर नामदेव लटपटे,सिद्धेश्वर बोबडे हे मेहनत घेत आहेत.

# नागपंचमीचा सण साजरा; पारंपारिक झोका पंचमी मात्र झाली दुर्मिळ

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथे पोलिस स्टेशनच्या बाजुला असणाऱ्या वारूळाची व नागदेवताची सुवासिंनीनी पुजा करून नागपंचमीचा सण उत्साहात साजरा केला पण पारंपारिक झोका पंचमी मात्र दुर्मिळ झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. भारतीय संस्कृतीमध्ये प्रत्येक सणांला विशेष असे महत्व आहे.

सध्या श्रावण महिना सुरू आहे आणि श्रावण महिना म्हणजे सणांचा महिना म्हणून प्रसिद्ध आहे.त्यातच श्रावण महिन्यातील पहिला सोमवार असल्याने व नागपंचमी या सणा विशेष असे महत्व प्राप्त झाले आहे.नागपंचमीचा सण म्हणजेच पारंपारिक झोका पंचमीचा सण म्हणून देखील भारतीय संस्कृतीमध्ये याला विशेष असे महत्त्व प्राप्त आहे.सणाच्या दिवशी सुवासिनी वारूळाची पुजा करून पुरणपोळीचा नैवेद्य घालतात तसेच नागदेवतेस दुध अर्पण करून पिकपाणी चांगले येऊदे म्हणुन नागदेवतास साकडे घालतात.युसूफवडगांव येथे महिलांनी सकाळ पासुनच पोलिस स्टेशनच्या बाजुला असणाऱ्या वारूळाची पुजा करण्यासाठी सुवासिंनीनी गर्दी केली होती. पुर्वी पुजन झाल्यानंतर महिला पारंपारिक झोका खेळण्याची परंपरा होती.नागपंचमीचा सण आठ दिवसावर आहे तोवरच झाडांना झोका बांधुन खेळण्याची ओढ असायची पण आज मात्र झाडांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी झाल्याने झोका बांधण्यास झाडेच उरली नाहीत त्यामुळे झोका बांधायचा कोठे हा प्रश्न मोठा आहे.तसेच या व्हॉट्सअप,फेसबुक व इंस्टाग्राम रीलच्या जमान्यात मात्र कित्येक वर्षांची पारंपरा असलेली पारंपारिक झोका पंचमी मात्र नामशेष झाल्यात जमा आहे असे म्हणण्यास हरकत नाही.

# डॉ. एस. आर. रंगनाथन यांची जयंती साजरी



पाटोदा । प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात ग्रंथालय विभागाच्या वतीने ९ ऑगस्ट रोजी ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. त्यांच्या हस्ते डॉ. रंगनाथन यांच्याप्रतिमेचे पूजन व पुष्पमाल्यार्पण करण्यात आले. याप्रसंगी पदव्युत्तर विभाग संचालक प्रो. गणेश पाचकोरे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड, ग्रंथपाल प्रा. जगन्नाथ पटाईत, प्रो. महादेव काळे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. कुशाबा साळुंके, डॉ. सोमनाथ लांडगे, प्रा. रुपेश कोकाटे आदि उपस्थित होते.कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्रा. जगन्नाथ पटाईत यांनी डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या शैक्षणिक व ग्रंथालयशास्त्र विषयातील योगदानावर सविस्तर भाष्य केले. आभारप्रदर्शन बाबासाहेब नाईकनवरे यांनी केले.

# सर्वसमावेशक चेहरा असलेल्या ज्ञानेश्वर मेंडके यांना भाजपाची उमेदवारी द्या

## कैकाडी महासंघाचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण गायकवाड यांची मागणी

माजलगाव । प्रतिनिधी

विधानसभेच्या रिंगणात उतरण्यासाठी अक्षरशः स्पर्धा लागलेली असताना स्वच्छ आणि चारित्र्य संपन्न उमेदवार म्हणुन मतदार संघातील जनता ज्ञानेश्वर मेंडके यांच्याकडे पाहत असुन भारतीय जनता पार्टीचे बळ वाढविण्यात तसेच संघटना बांधणीत त्यांनी मोठी भूमिका बजावलेली आहे आणि समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन काम करण्याची त्यांची हातोटी पाहता ज्ञानेश्वर मेंडके यांना भाजपने माजलगाव मतदार संघाची उमेदवारी द्यावी अशी मागणी अखिल भारतीय कैकाडी महासंघाचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण गायकवाड यांनी केली आहे.



ज्ञानेश्वर मेंडके हे मागील ३० वर्षांपासुन सक्रिय राजकारणात आहेत शिवसेनेचे तालुका प्रमुख म्हणून कार्य करीत असताना एक डॅशिंग नेता म्हणुन त्यांनी लौकिक मिळवलेला आहे.नंतरच्या काळात देखील त्यांनी लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांच्या नेतृत्वाखाली भाजपात प्रवेश केल्यानंतर पक्षबांधणीसाठी मोठे परिश्रम घेत येथील नागरपरिषदेवर भाजपचा झेंडा फडकविण्यात यश मिळवले.मुंडे साहेबांच्या पश्चात पंकजाताई मुंडे यांचे हात मतदारसंघात बळकट करण्यात ज्ञानेश्वर मेंडके यांचा मोठा वाटा असून एकनिष्ठ कार्यकर्ता काय असतो हे मेंडके यांच्या कार्यातून वेळोवेळी दिसुन आलेले आहे. वडवणीला तालुक्याचा दर्जा मिळावा म्हणुन सक्रिय आंदोलन देखील त्यांनी राबविले होते.या दरम्यान कुठल्याही आरोपाचा डाग त्यांच्यावर लागलेला नाही तसेच त्यांची कार्यव्याप्ती ही सर्व समाजातील तळागाळातील व्यक्तीपर्यंत पोंचलेली आहे.एक सर्वसमावेशक नेता म्हणून जनता त्यांच्याकडे पाहते त्यामुळे ज्ञानेश्वर मेंडके यांचे पक्षातील कार्य , असलेला जनसंपर्क पाहता आगामी विधानसभेची उमेदवारी भारतीय जनता पार्टीने द्यावी अशी मागणी अखिल भारतीय कैकाडी महासंघाचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण गायकवाड यांनी केली आहे.




जालना: शहर महानगरपालिका प्रथम वर्धापन दिनानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला यावेळी उद्घाटन व दीप प्रज्वलन करताना आयुक्त तथा प्रशासक संतोष खांडेकर व सौ खांडेकर शुभांगी देशपांडे डॉक्टर अनुराधा राख उपयुक्त नंदा गायकवाड (छायाचित्र : किरण खानापूर)

# गजानन खामकर ओबीसीच्या उमेदवारीचे दावेदार

## माजलगाव विधानसभेसाठी चर्चा

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील धडाडीचे ओबीसी नेता म्हणून ओळख असलेले गजानन खामकर यांची माजलगाव मतदार संघात सध्या विधानसभेसाठी जोरदार चर्चा चालू असून असे सर्वसामान्य नागरिकांतून बोलले जात आहे व प्रस्थापितासाठी नव्हे तर लोकशाहीत सर्वांना मुभा असते.याचे भान प्रस्थापितांना राहिले नाही. राजकीय मक्तेदारी मोडीत काढावी लागेल गेल्या लोकसभेत निवडणुकीत संधी हुकली ती आता हुकु द्यायची नाही. संधी दार ठोठावत असते हे सत्य असले तरी आज स्पर्धेच्या युगात तर दार तोडून संधी मिळवावी लागते. प्रसंगी घुसखोरावर मात करून गरुड भरारी घ्यावी लागते. माजलगाव मतदार संघाचा पल्ला गाठण्यासाठी गजानन खामकर यांची पुरेपूर तयारी झाली आहे. हट्ट करणं वाईट असतं पण कांही वेळी कांही हट्ट गुणकारी ठरतात. राजकीय दिशा ओळखून दूर दृष्टीने निर्णय घेऊन सकारात्मक पाऊल उचलण्याच्या निष्ठांतपणा त्यांच्या व्यक्तिमत्वात आहे. लोकांना गृहीत धरून एकाधिकारशाहीच राजकारण करणाऱ्यांना शह देत लोकांच्या मनातले प्रश्न ओळखुन लोक भावना हाताळून निर्णय घेत लक्ष गाठण्यासाठी वाटचाल चालू आहे. निस्वार्थ भावनेतून कर्तव्य निभावत जन प्रेम उभा केल आहे. जनसेवा आणि थेट संपर्क ही अत्यंत साधी रणनिती ठेवून कायम जनतेची नाळ जोडली आहे.समस्या निर्मूलनासाठी यश अपयशाची परवा न करता लोकशाही मार्गाने संघर्ष चालू आहे. समाजकारण आणि राजकारणाच्या माध्यमातून केलेली सेवा वेळोवेळी साधलेला संवाद व संपर्क यामुळे निर्माण झालेली लोकशक्ती प्रचलित प्रस्थापितांना गारद करण्यासाठी माजलगाव सज्ज आहे. राजकीय मक्तेदारी व दहशतीखाली दबलेला काही मतदार वर्ग खुल्या मनाने बोलत नसला तरी निवडणुकीच्या रणधूमाळीत भय मुक्तीसाठी गजानन खामकर यांना बिनधास्त मतदान करेल. आज. घडीची राजकीय परिस्थिती लक्षात घेता गजानन खामकर यांच्या जिद्दीला माजलगाव यांची साथ निश्चित लाभू शकते. हे मात्र खरे आहे

# सोयाबीनचे दर पडल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी तर सरकारचे शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष

युसूफवडगांव । प्रतिनिधी

शेतकऱ्यांना इतर निरर्थक प्रश्नांमध्ये गुंतवुन शासनाने शेतकऱ्यांच्या मुलभूत प्रश्नांना बागल दिल्याचे दिसुन येत आहे.शेतीमालाला हमीभाव देण्याची वचने द्यायची आणि शेतकऱ्यांचा माला बाजारात आला की त्याला कवडीमोल भावाने आपला माला विकावा लागत असल्याने केंद्र व राज्य शासनावर शेतकऱ्यांची तीव्र नाराजी दिसुन येत आहे.

नुकत्याच झालेल्या निवडणुकानंतर शेतकऱ्यांची अपेक्षा होती की त्यांच्या समस्या आणि गरजा नव्या सरकारच्या अजेंड्यावर अग्रक्रमाने येतील.मात्र,सत्ताधाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित करण्याऐवजी त्यांच्या समस्या दुर्लक्षित केल्याची भावना शेतकऱ्यांमध्ये पसरली आहे.कवडीमोल दरांमुळे शेतकऱ्यांची परवड होत असुन सोयाबीन,कापूस,तूर,हरभरा अशी अनेक पिके सध्या अत्यंत कमी दरांमध्ये विकली जात आहेत.उत्पादन खर्च देखील निघत नाही,असे शेतकरी म्हणतात.सोयाबीनच्या किंमतीने तर खालचा स्तर गाठल्याने शेतकऱ्यांनी सोयाबीन पिक घ्यावे का नाही घ्यावे हाच प्रश्न निर्माण होत आहे उत्पादन खर्च हा प्रतिएक्करी साधारणतः २०,००० रुपये येतो,मात्र बाजारात फक्त २५,००० रुपयांपेक्षाही कमी किंमतीत विकले जात आहे. यामुळे शेतकऱ्यांना याचा मोठ्या प्रमाणात आर्थिक फटका बसत आहे.तरी सुद्धा शेतकरी वर्गात याबाबत चिडीचुप धोरण असुन यावर शेतकरी राजा सुद्धा बोलायला तयार नाही. शेतकऱ्यांनी वेळीच यावर उठाव घेणे गरजेचे आहे अन्यथा येणाऱ्या काळात शेतकऱ्यांना सोयाबीन हे पिक घेणेच सोडुन द्यावे लागेल. निवडणूक प्रचाराच्या वेळी सत्ताधारी पक्षाने शेतकऱ्यांना विविध योजना,अनुदाने आणि मदतीचे आश्वासन दिले होते.मात्र निवडणूक संपल्यानंतर या वचनांची अंमलबजावणी झालेली नाही.सरकारने हमीभाव जाहीर केले,मात्र बाजारात त्याची अंमलबजावणी होताना दिसत नाही.शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र सुरूच गेल्या काही वर्षांमध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र सुरूच आहे.हे सत्र थांबविण्यासाठी सरकारने ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे.शेतकऱ्यांना कर्जमाफी,अनुदान आणि बाजारपेठेत समर्थन भाव मिळावा अशी त्यांची अपेक्षा आहे. सरकारने जाहीर केलेल्या हमीभावाची बाजारात काटेकोरपणे अंमलबजावणी करावी., शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली पाहिजे आणि कर्जाचे ओझे कमी केले पाहिजे. उत्पादन खर्च कमी करणे बी-बियाणे, खते, औषधे यांचे दर कमी करून शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी करावा. शेतकऱ्यांची नाराजी ही सत्ताधाऱ्यांसाठी एक गंभीर इशारा आहे.त्यांनी शेतकऱ्यांच्या समस्या गांभीर्याने घेऊन त्यावर तत्काळ उपाययोजना केल्या पाहिजेत.अन्यथा शेतकऱ्यांचा असंतोष अधिक वाढून पुढील येणाऱ्या निवडणुकांमध्ये त्याचा परिणाम भोगावा लागेल.सरकारने तात्काळ हमीभाव केंद्र सुरू करणे गरजेचे.सोयाबीन दर वाढण्याची शक्यता पुढे सुद्धा दिसत नाही तरीही सरकार शांत का आहे?असे असले तरी शेतकरी वर्गात याबाबत नाराजीचा विस्फोट का दिसत नाही?याबाबत सर्व शेतकऱ्यांनी एकत्र येऊन याविरुद्ध आवाज उठावणे गरजेचे असल्याचे मत एसएसके अँग्रोचे शिवराज खरबड यांनी व्यक्त केले जोपर्यंत शेतकरी एकत्र येणार नाही तोपर्यंत शेतीमालाला योग्य दर मिळणार नसल्याचे यावेळी त्यांनी नमुद केले.

# शरद गुंडिबा कांबळे याचे तिहेरी यश

अंबाजोगाई । प्रतिनिधी

केज तालुक्यातील पैठण (सावळेश्वर) येथील शरद गुंडिबा कांबळे यांने तिहेरी यश मिळवत केमिस्ट्री विषयात सेट, नेट व गेट परीक्षा उतीर्ण केली आहे. त्याच्या तिहेरी यशाबद्दल सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.

शरद कांबळे हा अतिशय प्रतिकुल परीस्थीतीत शिक्षण घेत आहे. त्यांने आपले सहावी ते बारावीचे शिक्षण नवोदय विद्यालय गढी येथे पुर्ण केले तर बीएससी व एमएससी चे शिक्षण अंबाजोगाई शहरातील योगेश्वरी महाविद्यालयातून पुर्ण केले आहे. सध्या तो मुंबई विद्यापिठातील ''डिपारमेंट ऑफ ऑटोमिक एनर्जी'' या विभागात पीएचडी करीत आहे. त्यांने केमिस्ट्री विषयाची ऑगस्ट २०२४ रोजी झालेल्या सेट परीक्षा उत्तीर्ण केली आहे.



या पूर्वी डिसेंबर २०२३ मध्ये झालेल्या नेट परीक्षेत ऑल इंडीया मध्ये ९० वी रँक मिळवली आहे. तसेच फेब्रुवारी मध्ये झालेल्या गेट परीक्षेत पण उत्तीर्ण झाला आहे. शरद कांबळे याने सेट, नेट व गेट परीक्षा उतीर्ण करुन तिहेरी यश मिळवीले आहे. त्याच्या यशामध्ये त्याचे आई-वडील व योगेश्वरी महाविद्यालयाच्या केमीस्ट्री विभागचो डॉ. प्रा. संतोष सुर्वे यांचे मोलाचे योगदान लाभले आहे.

राज्य लोकतंत्र
शनिवार दि.१० ऑगस्ट २०२४ | ६

# कर्जमाफी, पिक विम्यासाठी शेकापचे पडत्या पावसात धरणे आंदोलन

## पिक विमा न दिल्यास पालकमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण होऊ देणार नाही -भाई ॲड.नारायण गोले

**माजलगाव । प्रतिनिधी**

गेल्या दहा वर्षात शेतकऱ्यांची आणि शेतीची अवस्था प्रचंड वाईट झालेले असताना शासन शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडून हक्काचा हमीभाव देखील देण्यास तयार नाही तसेच कर्जमाफीची घोषणा हवेतच विरली असून पिक विमा अद्याप शेतकऱ्यांच्या खात्याात जमा झालेला नाही याशिवाय लोकनेते सहकारी साखर कारखान्याने गेल्या दोन वर्षापासून शेतकऱ्यांचे पैसे दिलेले नसून संकटात सापडलेला शेतकरी कोंडीत पकडण्याचे पाप लोकनेते कारखाना प्रशासनाने केली आहे त्याामुळे शेतकरी कामगार पक्ष आक्रमक झाला असून शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी झालीच पाहिजे, पिक विमा शेतकऱ्यांना तात्काळ मिळालाच पाहिजे, उसाचे गेल्या

दोन वर्षाचे राहिलेले पैसे तात्काळ शेतकऱ्यांचा खात्याात जमा झाले पाहीजे.. पि एम किसान यौजने पासुन वंचित शेतकर्यांचा सदर यौजनेत तत्काळ समावेश केला पाहीजे..शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारीत हमी भाव दिला पाहिजे बि-बियाणांच्या व खतांच्या वाढत्याा किमती तात्काळ कमी झाले पाहिजे..माजलगाव तालुक्यातील सर्वच पांदन रस्त्याचे मुरुम- खडीकरण झाले पाहिजे.

रुपा माता गुळ कारखाण्या कडील थकीत बिले त्वारीत द्यावेत. कृषी विभागाकडे शेतकऱ्यांची थकीत असलेली सबसिडीची रक्कम त्वारित खात्याात जमा करा. कृषी कार्यालय, तहसील कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग येथे होणारी नागरिकांची हेळसांड थांबवा.




विद्यार्थ्यासाठी विशेष बस सेवा सुरू करून विद्यार्थ्यांची हेळसांड थांबवा.

जात प्रमाणपत्रे, नॉन क्रिमिलिअर प्रमाणपत्रे त्वारित वाटप करा.

महा-ई-सेवा केंद्राकडून होणारी नागरिकाची लूट थांबून दर पत्रके लावा. मयत व्यक्तीच्या नावे केवायसी करून पैसे उचलणाऱ्या एस बी आय च्या अधिकाऱ्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करा.. या मागण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाचे राज्य मध्यवर्ती समिती सदस्य भाई ॲड.नारायण गोले पाटील यांच्या नेतृत्वाखाली माजलगाव उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर सकाळी दहा वाजल्यापासून चार वाजेपर्यंत पडत्याा पावसात धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी कृषी अधिकाऱ्या सह विमा कंपनीच्या अधिकाऱ्यांना पिक विम्याच्या प्रश्नावर आंदोलकांनी चांगलेच धारेवर धरले तसेच शासनाने १५ ऑगस्ट पूर्वी पीक विमा शेतकऱ्यांच्या खात्याात जमा न केल्यास कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते ध्वजारोहण होऊ देणार नाही असे आवाहन शेतकरी कामगार पक्षाचे राज्य मध्यवर्ती समिती सदस्य भाई ॲड.नारायण गोले पाटील यांनी यावेळी केले,या आंदोलनाला माजी आमदार राधाकृष्ण अण्णा होके पाटील यांनी युवा नेते तन्मय भैया होके पाटील यांच्यासह पडत्याा पावसात उपस्थित राहून पाठिंबा दिला तर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष तथा अल्पसंख्यांक कार्याध्यक्ष नुमानभाई चाऊस, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष मनोहर डाके, मुंजाभाऊ घायतिडक यांनी आंदोलनाला पाठिंबा दिला तर यावेळी भाई मुंजा पांचाळ, भाई अनंत चव्हाण, भाई गणपत आप्पा कोळपे,भाई विष्णू शेळके, भाई लक्ष्मण आप्पा चव्हाण, भाई राहुल सोळंके, भाई चांगदेव शेजुळ, भाई माऊली चंदनशिव, भरत सोळंके, राजेभाऊ शेरकर, माऊली गडदे, शिवाजी हांडे, उमाजी वैद्य,भास्कर कांबळे, जयराम राऊत, अशोक सोळंके सर, बालासाहेब शिंदे, राजेश्वर मोरे, नीलाराम टोळे, श्रीराम कोरडे, महमूद पटेल, श्रीराम शेळके, विलास जावळे, सिद्धेश्वर काळे, दिलीप वानखेडे, गणेश रामभाऊ काळे, धनराज सावंत, बाबासाहेब कदम, योगेश गोपाळ, लक्ष्मण काळे, ज्ञानेश्वर शिंदे, राजेश डाके बाबुराव पोळ, नामदेव शेरकर यांच्यासह शेकडो शेतकरी बांधव उपस्थित होते.

# जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य वाटप

**पिंपळवंडी । प्रतिनिधी**

शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे यांच्या वतीने भगवा सप्ताह आयोजित करण्यात आला होता,व तसेच शिवसेना जिल्हाप्रमुख प्रा.परमेश्वर सातपुते सर यांच्या वाढदिवसानिमित्त उपजिल्हाप्रमुख आजिनाथ खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद शाळा आंबेवाडी येथे प्रा.अशोक त्त्याााा पवार शिवसेना प्रभारी तालुका प्रमुख पाटोदा यांच्या वतीने खाऊ व शालेय




साहित्या वाटप करण्यात आले व शिक्षकवृंद यांच्याकडून या कार्यक्रमाचे कौताक करण्यात आले.

या कार्यक्रमाला रोहित पवार,युवा नेते नवनाथ पवार,दादासाहेब पवार, निलेश पवार,जयदत्त पवार,परवेज शेख यांच्या सह शिक्षकवृंद व शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते.

# मुकुंदराज वनपर्यटनासाठी दीड कोटींचा निधी झाला उपलब्ध

## आ.नमिता मुंदडांच्या माध्यमातून पर्यटन आणि रोजगाराला मिळणार चालना

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

निसर्गाने मुक्तहस्ते वरदान दिलेल्या मुकुंदराज स्वामी समाधी परिसराचा पर्यटनाच्या दृष्टीकोनातून विकास करण्यासाठी राज्य शासनाने १ कोटी ४७ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. वनसंपदेचे भांडार असलेल्या या भागाचा विकास करण्याच्या हेतूने आ. नमिता मुंदडा यांनी शासनाकडे वारंवार केलेल्या मागणीला यानिमित्ताने यश मिळाले आहे.

अंबाजोगाई लगतच्या डोंगर रांगात मराठीचे आद्यकवी स्वामी मुकुंदराज यांची समाधी आहे. डोंगर-दऱ्या असलेल्या या परिसरात निसर्गाने मुक्तहस्ते सृष्टिसौंदर्याची उधळण केलेली आहे. अमाप वनसंपदा आणि नैसर्गिक सौंदर्य लाभलेला हा परिसर निसर्ग पर्यटनाच्या दृष्टीकोनातून वंचित राहिला. या परिसराचा विकास व्हावा आणि पर्यटनाच्या



माध्यमातून अनेकांना रोजगार मिळावा या हेतूने केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी मुकुंदराज वनपर्यटनासाठी वनविभागाकडे ६ कोटी ३८ लाख रुपयांचा प्रस्ताव दिला होता. यापैकी २ कोटी ७८ लाख रुपयांचा प्रस्ताव शासनाकडून मंजूर करण्यात आला आहे. एवढेच नव्हे तर मंजूर पैकी १ कोटी ४७ लाख रुपयांचा निधी देखील उपलब्ध करून देण्यात आला आहे. यामुळे मुकुंदराज स्वामी निसर्ग पर्यटन स्थळाच्या विकासाला चालना मिळणार आहे. मूळ प्रस्तावातील तुटी दूर करून उर्वरित निधी देखील मंजूर करून घेण्यासाठी प्रयत सुरु असल्याचे आ. नमिता मुंदडा यांनी सांगितले आहे. दरम्यान, मुकुंदराज वनपर्यटन हा अंबानगरीच्या विकासात मैलाचा दगड ठरणार असल्याने यासाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, वनमंत्री सुधीर मुनगुंटीवार, आ. पंकजाताई मुंडे, भाजप नेत्याा डॉ.प्रितमताई मुंडे यांचे आ. नमिता मुंदडा आभार मानले आहेत.

# स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातूनच विद्यार्थी घडतो -प्रतीक्षा काळे

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

शालेय जीवनातच जर स्पर्धा परीक्षेची सवय झाली,तर पुढील यू.पी.एस.सी.व एम.पी.एस.सी. परीक्षा देताना कसलीही अडचण येत नाही. परीक्षे बद्दल ची भीती दूर होते. यासाठी शालेय जीवनातच सर्व स्पर्धा परीक्षा द्या. असे आवाहन नुकत्याच यू.पी.एस.सी.परीक्षेत

भारतीय वनसेवा विभागात देशात दुसरा क्रमांक पटकावणाऱ्या प्रतीक्षा काळे यांनी केले. येथील रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी व स्वामी विवेकानंद बाल विद्यालय यांच्या वतीने मंगळवारी युवा करिअर मार्गदर्शन व सत्कार समारंभ आयोजित




करण्यात आला होता.तसेच यावेळी विवेकानंद शाळेचा माजी विद्यार्थी नमित संजय सुराणा यांची न्यूयॉर्क युनिव्हर्सिटी येथे पुढील उच्च शिक्षणासाठी निवड झाली. या बद्दल त्यांचा रोटरी क्लबच्या वतीने सत्कार करण्यात आला.यावेळी प्रतीक्षा काळे उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बोलत होत्याा. यावेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष कल्याण काळे,सचिव धनराज सोळंकी, प्रकल्प संचालक स्वरुपा कुलकर्णी,सह संचालक गणेश राऊत, संस्थेचे अध्यक्ष संतोष कुलकर्णी, उद्योजक संजय सुराणा उपस्थित होते. यावेळी प्रतीक्षा काळे यांनी विद्यार्थ्यांना विविध परीक्षांचे मार्गदर्शन केले.व त्याांच्या प्रश्नांची उत्तरे दिली. यावेळी प्रतीक्षा काळे,व नमित सुराणा यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वरुपा कुलकर्णी यांनी केले.संचलन निशिगंधा जोगदंड यांनी केले.तर आभार धनराज सोळंकी यांनी मानले. यावेळी अजित देशमुख,ओमकेश दहिफळे, रुपेश रामावत, रमेश देशमुख, संजय देशमुख यांच्यासह शाळेतील शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

# शहरातील वैभवात भर टाकणाऱ्या स्ट्रीट लाईटचे आज शिवराज पवारांच्या हस्ते उद्घाटन

**गेवराई । प्रतिनिधी**

आ.लक्ष्मण पवार यांच्या प्रयतातून वैशिष्ट्यपूर्ण योजनेंतर्गत नगरपालिकेच्या माध्यमातून शहराच्या वैभवात भर पडणा-या नविन आकर्षक स्ट्रीट लाईटचे (पथ दिवे) युवानेते शिवराज पवार यांच्या हास्ते आज शनिवार रोजी सायंकाळी ६ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकात उद्घाटन करण्यात येणार आहे तरी शहरातील नागरिकांनी उपस्थित रहावुन विकासाचे साक्षीदार व्हावे असे



आव्हान करण्यात येत आहे

गेवराईकरांनी नगरपालिका पवार कुटुंबाच्या नेतृत्वाखालील निवडुन दिली तेव्हापासून बाळराजे दादा पवार यांच्या मार्गदर्शनात



आ.लक्ष्मण पवार यांनी शहरातील स्वच्छता,पाणी या मुलभुत सुविधासह शहरातील स्विमिंग पूल, सुज्ज नाट्यगृह, अशा शहरातील वैभवात भर पडणारी नविन आकर्षक स्ट्रीट लाईटचे काम सुरू आहे त्याा कामांचे उद्घाटन युवानेते शिवराज पवार यांच्या हास्ते आज शनिवार रोजी सायंकाळी ६:३० वाजता करण्यात येणार आहे तरी शहरातील सर्व नागरिक पत्रकार आजि.माजी नगराध्यक्ष नगरसेवक यांनी उपस्थित रहावे.



**दिंद्रुड : येथील उद्योजक सचिन शिंदे यांचा नुकतेच अकाली निधन झाले. माजलगाव विधानसभेचे ओबीसी नेते माधव निर्मळ यांनी गुरुवारी शिंदे कुटुंबीयांची भेट घेत शांत्वन केले.**

# वैद्यकिय महाविद्यालयाच्या मागणीला आरोग्यमंत्री नड्डांकडून होकार

## खा.बजरंग सोनवणेंनी भेट घेवून केली सविस्तर चर्चा

**बीड । प्रतिनिधी**

बीडसाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मंजूर करावे, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय आरोग्यमंत्री जगतप्रकाश नड्डा यांची भेट घेवून केली. यावेळी नड्डा यांनी सदरील मागणीचे पत्र वाचून लवकरच याबाबत निर्णय घेवू, असा होकारही दिला. यावेळी खा.सोनवणे यांनी जिल्ह्याच्या



आरोग्य विभागाच्या दृष्टीने सविस्तर चर्चाही केली.

दि.९ ऑगस्ट रोजी केंद्रीय आरोग्य मंत्री नड्डा यांची बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी भेट घेतली. यावेळी नड्डा यांनी बीड जिल्ह्यातील आरोग्य विभागासंबधित असलेल्या अडचणींबाबत जाणून घेतले. यावेळी बीडच्या विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय बीडला झालेच पाहिजे, असा आग्रह खा.सोनवणेंनी धरला. शिवाय बीड जिल्ह्यातील आरोग्यव्यवस्थेचा बोजवारा उडाला आहे, अशा स्थितीत मेडिकलच्या विद्यार्थ्यांचेही भवितव्य अंधारात आहे.या सर्व परिस्थितीवर मात करण्यासाठी जिल्ह्याला मायबाप शासनाने हे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मंजूर ◀◀ पान ३ वर

# गणगेवाडी येथील विषारी सर्प दंशाने शेतकरी महिलेचा मृत्यू

**आष्टी । प्रतिनिधी**

तालुक्यातील बीडसांगवी ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या गणगेवाडी येथील महिलेचा पहाटे झोपेत असताना विषारी सर्पदंश झाल्याने मृत्यू झाला.भिवराबाई अश्रूबा गणगे (वय ६५) असे या



महिलेचे नाव आहे. दुर्दैवाने नागपंचमीच्या दिवशी ही दुर्दैवी घटना घडल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

भिवराबाई गणगे स्वतःच्या शेतात पत्र्याच्या घरात झोपेत असताना शुक्रवारी पहाटे चारच्या दरम्यान विषारी सापाने दंश केल्याचे त्याांच्या लक्षात आले.याबाबतची माहिती त्याांनी कुटुंबियांना दिल्यानंतर खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु, उपचारादरम्यान त्याांचा मृत्यू झाला.भिवराबाई गणगे यांची घरची आर्थिक स्थिती बेताची आहे. तहसिलदारांनी शासनाच्या आपत्ती निवारण निधीतून गणगे कुटुंबियांना आर्थिक मदत मिळवून द्यावी अशी मागणी बीडसांगवी ग्रामपंचायतचे सरपंच नंदकिशोर करांडे यांनी केली आहे.त्याांच्या पश्चात पती,दोन मुले,सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# घरो घरी तिरंगा मोहिमेत नागरिकांना सहभागी होण्यासाठी आवाहन

बीड । प्रतिनिधी

१५ ऑगस्ट स्वातंत्र्या दिनाच्या अनुषंगाने घरोघरी तिरंगा हा उपक्रम ९ ऑगस्टपासून राबविण्यात येत असून दि. १३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट या कालावधीत नागरिकांनी आपल्या घरावर, दुकानावर, शासकीय अर्धशासकीय संस्था तसेच इतर खाजगी कार्यालयावर तिरंगा झेंडा सन्मानाने लावावा. तसेच झेंडयाचा अवमान होणार नाही याचीही काळजी नागरिकांनी घ्यावी, असे आवाहन स्वतंत्र्या दिनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती सभागृहात आयोजित पूर्व तयारी बैठकीत



## स्वातंत्य दिन मुख्य शासकीय सोहळा पूर्वतयारीचा आढावा

प्रशासनाने केले.

या बैठकीस जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, संगिता देवी पाटील,निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) चे शैलेश सुर्यवंशी तसेच विविध विभागाचे संबधित अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. उपक्रमातंर्गत नागरिकांसाठी तिरंगा झेंडा नगर पंचायत, ग्रामपंचायत, उपविभागीय अधिकारी कार्यालय, तहसील कार्यालय येथे अल्प दरात उपलब्ध करुन देण्यात येतील. स्वातंत्र्या दिनी अर्थात १५ ऑगस्टच्या मुख्य शासकीय कार्यक्रम होणाऱ्या ध्वजस्तभांच्या ठिकाणी स्वच्छतेची व ध्वजस्तंभाच्या नीटनेटकेपणाची योग्य ती तयारी करण्याच्या सूचना निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संगिता देवी पाटील यांनी संबधित विभागास केल्या. घरो घरी तिरंगा या उपक्रमाअंतर्गत ९ तारखेपासून राबविण्यात येणा-या कार्यक्रमाचा संबधित विभागाने आढावा घ्यावा, अशा सूचनाही प्रशासनाने या बैठकीत दिल्या.



**म्हसोबावाडी : शरद पवार गटाचे अल्पसंख्यांक आष्टी तालुकाध्यक्षपदी शौकत पठाण यांची निवड झाली असता त्यांचा सत्कार करताना कृष्णा बडे सह पत्रकार प्रेम पवळ.**

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांची रविवारी पुण्यात शांतता रॅली; शहरातील तयारी पूर्ण

**पुणे । प्रतिनिधी**

मराठा समाजास ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे या मागणीसाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांच्या उपस्थितीत रविवारी पुण्यात शांतता रॅली काढण्यात येणार आहे. त्यासाठीची पिंपरी-चिंचवड शहरातील तयारी पूर्ण झाली आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील समाज बांधवांनी यात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

मनोज जरांगे-पाटील गेल्या अनेक महिन्यांपासून मराठा समाजास ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे यासाठी विविध प्रकारची आंदोलने करत आहेत. मराठा समाजात जनजागृती व्हावी व समाजासमाजात शांतता निर्माण व्हावी यासाठी मनोज जरांगे पाटील यांचा बुधवार दिनांक ७ ऑगस्ट पासून पश्चिम महाराष्ट्रात दौरा सुरू आहे.सोलापूर, सांगली,कोल्हापूर,सातारा जिल्ह्यांचा दौरा करून जरांगे पाटील रविवारी ( दि. ११) रोजी पुण्यात येत आहेत.या दौऱ्याच्या नियोजनासाठी पुणे जिल्ह्यातील हजारो कार्यकर्ते गेल्या अनेक दिवसांपासून नियोजन करत आहेत.

पिंपरी-चिंचवड शहरात शेकडो मराठा सेवक नियोजन करत असून यासाठी शहरात विविध ठिकाणी अनेक बैठका गेल्या पाच दिवसात पार पडल्या असून मराठा बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.जरांगे पाटील रविवारी सातारा दौरा संपवून सकाळी अकरा वाजता स्वारगेट जवळील सारसबाग येथे येणार आहेत. सारसबाग येथून लाखो बांधवांसह सकाळी अकरा वाजता जरांगे पाटील यांच्या मराठा जनजागृती व महा भव्य शांतता रॅलीला सुरुवात होणार आहे. ही रॅली सारसबाग, बाजीराव रोड,अप्पा बळवंत चौक, शनिवारवाडा, छत्रपती शिवाजी महाराज पूल, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक मार्गे जंगली महाराज रोड,बालगंधर्व चौक येथून छत्रपती संभाजी महाराज पुतळा डेक्कन मार्गे रॅली



अलका टॉकीज चौकात येणार आहे. या ठिकाणी जाहीर सभा होणार असून मनोज जरांगे-पाटील उपस्थित लाखो बांधवांना संबोधित करणार आहेत. याच ठिकाणी रॅलीचा समारोप होणार आहे. या रॅलीत पिंपरी-चिंचवड शहरातील विविध भागातून लाखो मराठा बांधव सहकुटुंब सहभागी होणार आहेत. यासाठी शहरातील भक्ती शक्ती समूह शिल्प चौक,डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा डांगे चौक,भोसरी पी.एम.टी.चौक, कासारवाडी चौकातून सकाळी नऊ वाजल्यापासून मराठा बांधव चारचाकी व दुचाकी वरून पुण्याकडे रवाना होणार आहेत.काळेवाडी,थेरगाव, वाकड,रहाटणी परिसरातील हजारो बांधव डांगे चौक थेरगाव येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून सकाळी दहा वाजता औंध मार्गे पुण्याकडे दुचाकी रॅलीने रवाना होणार आहेत.

थेरगाव चिंचवड विभागाचे नियोजन सकल मराठा समाजाचे समन्वयक सतिश काळे, प्रकाश जाधव, वैभव जाधव,नकुल भोईर, वाल्मिक माने,सर्जेराव पाटील, लहू लांडगे,सचिन बारणे, रावसाहेब गंगाधरे,रमेश कदम व त्यांच्या सहकार्यांनी केले आहे.शहरातील सर्व समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहकुटुंब या रॅलीत सहभागी व्हावे असे आवाहन सकल मराठा समाज,मराठा क्रांती मोर्चा पिंपरी-चिंचवड शहराच्या वतीने करण्यात आले आहे.

# दाम्पत्याचा २० दिवसांतच परस्पर संमतीने घटस्फोट !

**पुणे । प्रतिनिधी**

वैचारिक मतभेदामुळे वेगळे राहणाऱ्या दांपत्याचा घटस्फोट २० दिवसात मंजुर झाला आहे. कौटुंबिक न्यायालयाचे न्यायाधीश के.ए. बागे-पाटील यांनी हा निकाल दिला आहे. विशेष म्हणजे दोघांचा प्रेम विवाह होता. सर्वोच्च न्यायालयाच्या न्याय-निवाड्यानुसार परस्पर संमतीने घटस्फोटाचा दावा दाखल करण्यापूर्वी दोघे १८ वेगळे राहत असल्यास सहा महिन्याचा कालावधी वगळता येतो.

या प्रकरणात दाव दाखल करतेवेळी दोघे नोव्हेंबर २०२२ पासून वेगळे राहत आहेत. त्यामुळे हा कालावधी वगळण्याची मागणी अर्जदार वकिलांनी केली. त्यानुसार न्यायालयाने हा निकाल दिला आहे.

माधव (वय ४२) आणि माधवी (वय ४७) (नावे बदलली आहेत) अशी त्या दोघांची नावे आहेत. दोघांतर्फे ड. कुमार माळवदकर, ड. नंदकिशोर येरंडे यांनी काम पाहिले. त्यांना ॲड. विवेक माळवदकर, ॲड. मुकुल महिंद्रकर यांनी सहकार्य केले. वकिलांनी कौटुंबिक न्यायालयात परस्पर संमतीने घटस्फोटासाठी अर्ज दाखल केला होता. तो आणि ती दोघेही नोकरी करायचे. ती त्याच्यापेक्षा मोठी आहे. तिचे दुसरे लग्न आहे. तिला पहिल्या पतीपासून मुलगी आहे. २४ ऑक्टोबर २००८ रोजी त्यांचा प्रेमविवाह झाला. काही दिवस सुरळीत संसार केला. त्यानंतर दोघात वाद होऊ लागले. वाद विकोपाला गेल्यानंतर दोघे वेगळे राहू लागले. २७ सप्टेंबर २०२२ पासून वेगळे राहत आहेत. दोघांनी परस्पर संमतीने घटस्फोटासाठी दावा दाखल केला. काही दिवस सुरळीत संसार सुरू होता.निकालानुसार मुलगी पत्नीकडे असणार आहे.

# पुण्यातील पुरग्रस्तांसाठी जिल्हाधिकाऱ्यांनी जाहीर केली मोठी मदत

**पुणे । प्रतिनिधी**

गेल्या दोन आठवड्यापूर्वी पुणे शहर आणि परिसरात मुसळधार पाऊस झाला. सतत पडणाऱ्या पावसामुळे खडकवासला धरण ओव्हरफ्लो झाले. यामुळे धरणातून मोठ्या प्रमाणात पाणी सोडण्यात आले. त्यामुळे शहरातील अनेक भागात पूरस्थिती निर्माण झाली आणि परिस्थिती गंभीर बनली. पुणे महानगर पालिका हद्दीत देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. सध्या पुणेकर या भीषण स्थितीतून सावरत आहेत. त्यातच आता पुणेकरांसाठी एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. पुण्यातील पूरग्रस्तांना २५ हजार रुपयांची आर्थिक मदत केली जाणार आहे. पुण्याचे जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी याबद्दलचे आश्वासन दिले आहे.



बालेवाडी ब्रीज, मुळा नदी ब्रीज, संगम रोड ब्रीज, होळकर ब्रीज, संगमवाडी ब्रीज, महर्षी शिंदे ब्रीज, हडपसर- मुंढवा रोड ब्रीज, मातंग ब्रीज, येरवडा शांतीनगर येथील ब्रीज, निंबजनगर ब्रीज, मोई, व चिकली रस्त्यावरील इंद्रायणी पुल पावसामुळे पाण्याखाली गेले. एकता नगरी सिंहगड रोड वरील द्वारका सोसायटी, शरदा सरोवर सोसायटी, शाम सुंदर सोसायटी, निंबजनगर परिसरातील सोसायटी, सिंहगड रोड, घरकुल सोसायटी पिंपरी चिंचवड, वृंदावन आश्रम आकुर्डी, विशालनगर, जगताप डेअरी विणस सोसायटी, कुंदननगर या गृह निर्माण हाउसिंग सोसायटी मध्ये पावसाचे पाणी शिरले होते.

पुण्यामध्ये आलेल्या पुरात ज्यांचे कोणाचे नुकसान झाले आहे, त्यातील प्रत्येक कुटुंबाला २५ हजार रुपयांची मदत करण्यासाठी सरकार सकारात्मक आहे, असेही सुहास दिवसे यांनी म्हटले. त्यासोबतच पुण्यातील पूर स्थितीसाठी कारणीभूत ठरलेली अनेक अतिक्रमण देखील काढण्यात येणार आहेत. असेही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

पुण्यात पुराचे पाणी शिरलेल्यांना प्रतिकुटुंब पाच हजारांऐवजी दहा हजार रुपये मदत दिली जाणार आहे. राज्य सरकारच्या महसूल विभागाने याबद्दलची घोषणा केली आहे. तसेच जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्येक कुटुंबाला २५ हजार रुपयांची मदत करण्याचे निर्णय घेतला आहे. स्थानिक रहिवासी, शिधापत्रिकाधारक, मतदारयादीत नाव असलेले आणि नोंदणीकृत परवानाधारक दुकानदार आणि टपरीधारकांना नुकसानीच्या ७५ टक्के किंवा कमाल ५० हजार रुपये मदत दिली जाणार आहे.

# पुण्यात मध्यरात्री भरचौकात गुंडाचा खून, पाठलाग करून टोळक्यानं दगडाने ठेचलं

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यात पुन्हा एकदा गुन्हेगारी वाढतानाचे चित्र दिसून येत आहे. पुणे पुण्यात कुख्यात शरद मोहोळनंतर आता पुन्हा एका कुख्यात गुंडाचा खून (झ्रींपिश उीळाश छशुी) केल्याची घटना समोर आली आहे. या घटनेने पुण्यात पुन्हा एकदा मोठी खळबळ उडाली आहे. रामटेकडी परिसरात असलेल्या वंदे मातरम चौकात मध्यरात्री हा खून (झ्रींपिश उीळाश छशुी) करण्यात आला आहे. राजू शिवशरण असं या कुख्यात गुंडाचं नाव आहे. या प्रकरणी वानवडी पोलिसात घटनेची नोंद झाली असून पाच जणांना ताब्यात घेण्यात आलं आहे.



गुंड राजू शिवशरण याची मध्यरात्री दगडाने ठेचून खून करण्यात आला आहे. पुण्यातील रामटेकडी परिसरात असलेल्या वंदे मातरम चौकात मध्यरात्री टोळक्यांकडून राजू शिवशरण याचा दगडाने ठेचून खून करण्यात आल्याने पुन्हा एकदा गँगवॉरचा भडका उडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. राजू शिवशरण हा रामटेकडी परिसरातील कुख्यात गुंड आहे.


राजू शिवशरण खून प्रकरणात वानवडी पोलिसांनी पाच संशयितांना ताब्यात घेण्यात आलं आहे. मध्यरात्रीच्या सुमारास रामटेकडीतील राजू शिवशरण्याचा पाठलाग करून खून त्याचा खून केल्याची माहिती आहे. या खून प्रकरणी राजू शिवशरणचा भाचा निखिल कैलास चव्हाण, (रा. वंदे मातरम चौक गणपती मंदिर मागे, रामटेकडी, हडपसर) याने वानवडी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यानंतर महेश शिंदे ,नितीन पाटोळे, अरविंद माने, चेतन बावरी ,दुर्गेश उर्फ बल्ल्या गायकवाड, (रा सर्व रामटेकडी व इतर दोघेजण अनोळखी इसम) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हडपसर भागातील रामटेकडी येथे वंदे मातरम चौकात मध्यरात्री दीडच्या सुमारास हि घटना घडली. महेश शिंदे ,नितीन पाटोळे, अरविंद माने, चेतन बावरी ,दुर्गेश उर्फ बल्ल्या गायकवाड, आणि दोन इसमांनी पैसे न दिल्याच्या कारणावरून राजू शिवचरणला वीट, दगड , सिमेंटचे तुकडे, तसेच लाथा बुक्क्याने मारून गंभीर जखमी केलं. त्यावेळी राजू शिवशरणचा भाचा निखिल चव्हाण याने वाचवण्याचा प्रयत्न केला. मात्र, महेश शिंदेने त्याच्याही डोक्यात बाटली मारून त्याला जखमी केले आणि तो पळून गेला. असे फिर्यादीत नमूद केले आहे. पोलिस घटनेचा तपास करत आहेत.

# टॉवरच्या तारांची चोरी करताना पडून मृत्यू, साथीदारांनी मित्राला पुरले दुर्गम डोंगरात

**वेल्हे । प्रतिनिधी**

खानापूर रांजणे-पाबे घाट रस्त्यावरील रांजणे (ता. राजगड) येथे दुर्गम डोंगरावरील वीजेच्या टॉवरवर चढून तारांची चोरी करताना खाली पडुन एकजण मृत्युमुखी पडला. या घटनेत मृत्युमूखी पडलेल्या मित्राला घाटातील पाबे (ता. राजगड) खिंडीतील दुर्गम डोंगरात सोबतच्या दोन साथीदारांनी खड्डा करून त्यात पुरल्याचा हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.



बसवराज पुरंत मंगनमनी (वय २२, सध्या रा. वडगाव बुद्रुक, सिंहगड रोड, मुळ रा. तुळजापूर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर) असे मृत तरुणाचे नाव आहे. टॉवरवर चढून लोखंडी ब्लेडने तारांची वायर कापताना बसवराज हा १५० फुट खाली कोसळून मृत्युमुखी पडला. नंतर त्याचा मृतदेह त्याचे साथीदार रुपेश अरुण येनपुरे व सौरभ बापु रेणुसे (दोघे रा. पाबे, ता. राजगड) यांनी पाबे डोंगरात पुरून ठेवला असल्याची माहिती गुरुवारी (दि. ८) मध्यरात्री वेल्हे पोलीसांना समजली. त्यानंतर वेल्हे पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक अप्पासाहेब पडळकर यांच्यासह पोलिस जवान रेस्क्यू पथकाचे तानाजी भोसले, गणेश सपकाळ, संदीप सोलस्कर गुलाब भोंडेकर, संजय चोरघे आदींनी मध्यरात्री दुर्गम पाबे डोंगरात धाव घेतली मात्र अंधार व पावसामुळे पहाटे साडेतीनपर्यंत घटनास्थळाचा शोध लागला नाही. गेल्या महिन्यात १३ जुलै रोजी मयत बसवराज याच्यासह रुपेश येनपुरे व सौरभ रेणुसे हे तिघेजण रांजणे (ता. राजगड) येथे असलेल्या महावितरण कंपनीच्या वीजेच्या टॉवरच्या तांब्याच्या तारांची चोरी करण्यासाठी रात्री गेले होते. बसवराज हा टॉवर चढुन लोखंडी ब्लेडने (एक्साब्लेड) ने तारांची वायर कापत होता. त्यावेळी तो खाली पडुन गंभीर जखमी होऊन जागीच मृत्युमुखी पडला. त्यानंतर साथीदार रुपेश व सौरभ याने त्याचा मृतदेह तेथुन पाबे (ता. राजगड) घाटात आणला. घाटातील मंदिरासमोरच्या दुर्गम डोंगरात खड्डा खोदून त्यात बसवराज याचा मृतदेह गाडून दोघे पसार झाले

# नायलॉन मांजामुळे माजी सैनिक गंभीर जखमी

**बारामती । प्रतिनिधी**

वंजारवाडी (ता. बारामती) येथील माजी सैनिक अनिल कायगुडे (वय ४०) ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त अभिवादन करण्यासाठी हुतात्मा स्तंभ येथे जात होते. याचदरम्यान शुक्रवारी (दि.९) रोजी सकाळी आठच्या सुमारास येथील मएसो विद्यालयासमोर चिनी मांजाने त्यांचा गळा कापला गेला. यात ते गंभीर जखमी झाले. यानंतर नागरिकांनी त्यांना खासगी हॉस्पिटलमध्ये दाखल केले.



अनिल कायगुडे याच्या गळ्याला मोठी जखम झाली असून मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाला आहे. त्यामुळे त्याच्यावर शस्त्रक्रिया करावी लागली. अचानक झालेल्या या घटनेमुळे ते दुचाकीवरून खाली कोसळले.

प्रशासनाने गुन्हे दाखल केल्यानंतरही शहरात चिनी मांजा विकला गेला. परिणामी ही दुर्घटना घडली. आता तरी जागे होवून प्रशासन यावर कारवाई करणार का?, असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे. या घटनेत मेजर अनिल कायगुडे यांचा जीव थोडक्यात बचावला. अन्यथा नागपंचमी दिवशीच त्यांच्या जीवावर बेतले असते. केवळ दैव बलवत्तर म्हणून जीव वाचल्याचे सांगितले जात आहे.

# अटकपूर्व जामिनासाठी उच्च न्यायालयात गेलेल्या पूजा खेडकरला दिलासा नाहीच; सुनावणी ढकलली पुढे

**पुणे । प्रतिनिधी**

बडतर्फ I-S प्रशिक्षणार्थी पूजा खेडकरच्या अटकपूर्व जामिनावरील होणारी सुनावणी पुढे ढकलण्यात आली आहे. पूजा खेडकर प्रकरणात दिल्ली उच्च न्यायालयाची नवीन तारीख दिली आहे. आता ही सुनावणी १२ ऑगस्टला होणार आहे. दिल्ली उच्च न्यायालयात सुनावणी पार पडणार होती. अटकपूर्व जामीन मिळावा यासाठी पूजा खेडकरनी दिल्ली उच्च न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. पटियाला हाऊस न्यायालयानं १ ऑगस्टला पूजा खेडकरचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला होता. त्यानंतर पूजा खेडकरनं दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली आहे.



माजी ट्रेनी आयएएस अधिकारी पूजा खेडकरच्या याचिकेवरील सुनावणीसाठी दिल्ली उच्च न्यायालयाने शुक्रवारी १२ ऑगस्टची तारीख निश्चित केली आहे. त्यात तिचा अटकपूर्व जामीन फेटाळणाऱ्या जिल्हा न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देण्यात आले आहे. नागरी सेवा परीक्षेत परवानगीपेक्षा जास्त संधी मिळविण्यासाठी तिने स्वत:ची खोटी ओळख करून दिल्याचा आरोप तिच्याविरुद्ध नोंदवलेल्या एफआयआरमध्ये करण्यात आला आहे. शुक्रवारी न्यायमूर्ती सुब्रमण्यम प्रसाद यांच्या खंडपीठासमोर पूजा खेडकरच्या अटकपूर्व जामिनावरील सुनावणी सोमवारी पुन्हा ठेवण्यात आली आहे. दिल्लीच्या पटियाला हाऊस कोर्टाने गेल्या आठवड्यात तिची याचिका फेटाळल्यानंतर खेडकरनी दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे, ज्यामध्ये असे आढळून आले की नागरी सेवा परीक्षेत अतिरिक्त प्रयत्नांसाठी खोटी ओळख पटवण्याशी संबंधित आरोप आहेत. ट्रायल कोर्टाचे न्यायमूर्ती याबाबत म्हणाले की, संपूर्ण घटनेचा उलगडा करण्यासाठी आणि यामध्ये सहभागी असलेल्या इतर व्यक्तींचा सहभाग निश्चित करण्यासाठी आरोपीची कोठडीत चौकशी आवश्यक आहे.

# शिक्षणाच्या माध्यमातून आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करा-सहकार मंत्री दिलीप वळसे

**पुणे । प्रतिनिधी**


भारतीय राज्यघटनेने आदिवासी नागरिकांना दिलेले हक्क अबाधित राखून शिक्षणाच्या माध्यमातून या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी केले.



जागतिक आदिवासी दिनानिमित्त एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प घोडेगाव कार्यालयाच्यावतीने कोटमदरा येथे आयोजित आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी उपविभागीय अधिकारी गोविंद शिंदे, तहसीलदार संजय नागटिळक, सहायक गट विकास अधिकारी अर्चना कोल्हे, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी संदीप पाटील, सहायक प्रकल्प अधिकारी विजया पंढुरे, भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे, मंचर कृषी उत्पन्न बाजार समितीचे अध्यक्ष प्रकाश घोलप आदी उपस्थित होते.

वळसे पाटील म्हणाले, भारतीय राज्यघटनेने समाजातील सर्व नागरिकांना समान हक्क प्रदान केले असून आदिवासी नागरिकांचे हक्क अबाधित राखून त्यांचे रक्षण करावे, त्यांना सन्मानाची वागणूक द्यावी. आदिवासी समाजाच्या प्रगतीकरीता शासन नेहमीच प्रयत्नशील आहे. त्यांना मोफत शिक्षण, निवास, भोजन, शिष्यवृत्ती आदी सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत, या सुविधेचा शिक्षणाकरीता उपयोग केला पाहिजे. शिक्षणाच्या माध्यमातून आयुष्यात परिवर्तन होत असल्यामुळे समाजातील विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतले पाहिजे. ते पुढे म्हणाले, परिसरातील नागरिकांचे जीवनमान उंचविण्यासाठी विविध लोककल्याणकारी योजना राबवून त्यांना लाभ देण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचे शिक्षण मिळावे याकरीता आश्रमशाळेच्या अत्याधुनिक इमारती, मुला-मुलींची स्वतंत्र वसतिगृहे उभारण्यात येत आहे. येथील विद्यार्थ्यांना पुणे येथे पुढील शिक्षण घेता यावे, याकरीता ७ हजार विद्यार्थी क्षमतेचे वसतिगृह उभारण्याबाबत राज्याच्या आदिवासी विकास मंत्र्यासोबत चर्चा करण्यात आली आहे.

# १६ ऑगस्ट रोजी पंतप्रधानांच्या हस्ते भिडेवाड्याचे



## असे असेल स्मारक

तत्कालिन कालसुसंगत बाह्यरूप. तळघरात दुचाकींसाठी वाहनतळ. वर तीन मजली बांधकाम. फुले दाम्पत्याचे पुतळे. फुले दाम्पत्याच्या कार्याविषयी दृकश्राव्य माहिती. ग्रंथालय व महिला सक्षमीकरणासाठी प्रशिक्षण कक्ष.

**पुणे । प्रतिनिधी**

महात्मा जोतिबा आणि सावित्रीबाई फुले यांनी मुलींची पहिली शाळा सुरू केलेल्या भिडेवाड्यातील राष्ट्रीय स्मारकाचे भूमिपूजन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. येत्या १६ ऑगस्ट रोजी हा कार्यक्रम पुण्यात होणार आहे. कार्यक्रमाचे ठिकाण अद्याप निश्चित झालेले नसले, तरी पंतप्रधान या वाड्याला भेट देणार असल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली.

यानिमित्ताने पुण्यात येणाऱ्या पंतप्रधान मोदींच्या उपस्थितीत महायुतीकडून विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचा नारळ फोडला जाणार आहे. या भूमिपूजनासह स्वारगेट ते जिल्हा न्यायालय या भुयारी मेट्रो मार्ग, स्वारगेट-कात्रज मार्गाचे भूमिपूजन आणि वाघोली, तसेच चांदणी चौकापर्यंत मेट्रोच्या विस्तारीत मार्गाचे कामही यानिमित्ताने सुरू केले जाण्याची शक्यता आहे. महापालिकेच्या पूर्ण झालेल्या प्रकल्पाचे उद्घाटन, तसेच काही प्रकल्पांचे भूमिपूजन करण्याचे नियोजनही प्रशासनाकडून सुरू आहे. शासनाकडून याबाबतचे निर्देश नुकतेच महापालिकेस देण्यात आले आहेत. शिवाजी रस्त्यावरील सुमारे पावणेतीन गुंठे जागेतील भिडेवाडा मोडकळीस आला होता. तिथे स्मारक उभारण्याचा निर्णय अनेकदा घेतला गेला. मात्र, वाड्यातील भाडेकरूंनी न्यायालयात धाव घेतल्याने भूसंपादन रखडले होते. उच्च न्यायालयाने योग्य मोबदला देऊन भूसंपादन करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयानेही हेच आदेश कायम ठेवले. त्यामुळे भूसंपादनाचा मार्ग मोकळा झाल्यानंतर महापालिकेने डिसेंबर २०२३ मध्ये तातडीने हा वाडा भुईसपाट करून जागा ताब्यात घेतली. या कामासाठी सात कोटी २६ लाख ४८ हजार रुपये खर्च अपेक्षित आहे.